# नागरी सहकारी बँकेचे

# “ आदर्श पोटनियम”

**सर्व दुरुस्तीसह अपडेट दि. ३१/०३/२०२३ अखेर**

**(महाराष्ट्र राज्य)**

**बँकेचे नांव :-    दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप.बँक लि.,संगमनेर**

पत्ता :-    इंदिरा गांधी मार्ग,पोस्ट बॉक्स नं.13,संगमनेर
422605,   जिल्हा - अहमदनगर

(**टीप :-** महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागामार्फत राज्यातील नागरी सहकारी बँकांसाठी तयार करण्यात आलेल्या आदर्श उपविधीच्या मसुद्याचा हा स्वैर मराठी अनुवाद आहे.जेथे जेथे अर्थ स्पष्ट होत नाही तेथे शासकीय नियमानुसार नेमका अर्थ लावण्यासाठी इंग्रजीतील मसुदा ग्राह्य धरावा.)

दि संगमनेर मर्चन्ट्स को.ऑप.बँक लि,संगमनेर करिता

दिनांक 31-3-2023

मुख्य कार्यकारी अधिकारी    चेअरमन

# नागरी सहाकारी बँकेचे आदर्श पोटनियम

## 1) नांव :

बँकेचे नांव **दि संगमनेर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, संगमनेर** असे राहील.आणि सदर संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 नोंदणी क्र.26 / 11 / 1965, **ANR / BNK-107** अन्वये झाली असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मार्फत बँकेस बँकिंग व्यवहार करण्याचा परवाना क्र.**U.B.D.MH500P** दि.**18/08/1986** नुसार मिळाला आहे.

### 2) नोंदणीकृत कार्यालय :

1) बँकेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय संगमनेर -422 605,जि.अहमदनगर या पत्त्यावर असेल.
2) वरील पत्यामध्ये कोणताही बदल करावयाच झाल्यास सदर पोटनियमाची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मध्ये दिलेल्या पध्दतीनुसार दुरुस्ती करावी लागेल व त्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

### 3) कार्यक्षेत्रः

बँकेचे कार्यक्षेत्र अहमदनगर, नाशिक, पुणे, औरंगाबाद, ठाणे, बीड उस्मानाबाद, सोलापुर ह्या जवळील जिल्हे यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नोंदणी अधिकारी यांची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.( मा.वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 24-9-2019 ठराव क्र.9) ( मा.अप्पर निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कडील पत्र जा.क्र.ना.बँका/सआ-1/दिसंगमनेरमर्चंट्सबँक/पोनिदु/2019/3206 दिनांक 29.11.2019 अन्वये मंजुर)

### 4) व्याख्या :

1) 'कायदा' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या होय.
2) 'नियम'म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या होय.
3) ''निबंधक ''म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या तरतुदीनुसार नेमण्यात आलेला ''सहकारी संस्थांचा निबंधक''ही व्यक्ती होय.
4) ''पोटनियम'' म्हणजे बँकेचे सध्या अस्तित्वात असलेले व कायद्यानुसार नोंदणी करण्यात आलेले अथवा करण्यात येणारे पोटनियम व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या अथवा करण्यात येणाऱ्या दुरुस्ताया होय.
5) ''जनरल बॉडी'' म्हणजे सर्वसामान्य (क्रियाशील व अक्रियाशील) सभासद होय.
6) ''बोर्ड'' म्हणजे बँकेचे संचालक मंडळ होय.
7) ''सर्वसाधारण सभा'' म्हणजे मतदानाचा हक्क असलेले सर्व बँकेच्या सर्वसामान्य (क्रियाशील व अक्रियाशील) सभासदांची सभा. यामध्ये विशेष सर्वसाधारण सभेचाही समावेश होईल.

8) ''मुख्य कार्यकारी अधिकारी'' म्हणजे बँकेतील सर्वोच्च कार्यकारी अधिकारी होय. सदर अधिकाऱ्यास इतर कोणत्याही नावाने उदा.सरव्यवस्थापक,कार्यकारी संचालक,असे संबोधले तरी त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी असेच समजण्यात यावे.

9) ''व्यक्ती''म्हणजे कोणतीही प्रौढ व्यक्ती जी इंडियन कॉंट्रॅक्ट ॲक्ट 1972 च्या कलम 11नुसार करार करु शकते,स्वतःच्या मालकीची मालकी संस्था असलेली व्यक्ती ,भारतीय भागीदारी कायदा 1932 अन्वये नोंदलेली भागीदारी संस्था, अविभक्त हिंदू कुटूंब ,प्रचलित कायद्यानुसार / दुरुस्तीनुसार नोंदणी करण्यात आलेली कोणतीही कंपनी अथवा संस्था,राज्य सरकार, सार्वजनिक विश्वस्त संस्था किंवा इतर कोणत्याही संस्था होय.

10) ''पदाधिकारी'' म्हणजे संचालक मंडळाने निवडलेले अध्यक्ष,उपाध्यक्ष,नेमणूक करण्यात आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी,संचालक सदस्य,अवसायक,प्रशासक व अन्य अशी कोणतीही व्यक्ती जीची नियुक्ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियमांतर्गत व बँकेच्या आदर्श पोटनियमानुसार बँकेचा व्यवसाय चालविण्यासाठी आदेश / मंजूरी देणारी व्यक्ती.

11) ''सामान्य सभासद'' म्हणजे बँकेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणीनंतर कायदा,नियम व पोटनियमांनुसार ज्याचे सभासदत्व स्वीकरण्यात आलेले आहे अशी व्यक्ती.

12) ''नाममात्र सभासद ''म्हणजे सदर पोटनियमातील तरतूदीनुसार ज्या व्यक्तीस नाममात्र सभासद म्हणून प्रवेश स्वीकारले आहे अशी व्यक्ती .

13) ''क्रियाशील सभासद'' म्हणजे बँकेच्या व्यवहारामध्ये सदर पोटनियमातील तरतूदीनुसार सहभागी होणारी व ज्याने बँकेतील किमान सेवांचा लाभ घेतला आहे अशी व्यक्ती होय.

14) ''सहयोगी सभासद ''म्हणजे दुसऱ्या सभासदाबरोबर भाग धारण केलेली व्यक्ती. अशा व्यक्तीचे नांव भाग प्रमाणपत्रावर पहिले असणार नाही.

15) ''सहकारी संस्था'' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अन्वये नोंदणी करण्यात आलेली संस्था.

16) ''फेडरल सहकारी संस्था'' म्हणजे सहकार कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांचे फेडरेशन /असोसिएशन सदर फेडरेशन /असोसिएशनचे सभासदत्व बँकिंग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांनाच मिळू शकेल.

17) ''सहकारी बँक'' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अन्वये नोंदणी करण्यात आलेली अथवा नोंदणी करावयाची सहकारी संस्था.अशा संस्थेला बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट 1949(सहकारी बँकांना लागू केलेले )अन्वये लायसन्स प्रदान करण्यात आले आहे किंवा प्रदान करण्यात येणार आहे.

18) ''रिझर्व्ह बँक'' म्हणजे आर.बी.आय.ॲक्ट 1934नुसार निर्माण करण्यात आलेली भारतीय रिझर्व्ह बँक.

19) ''ठेव विमा महामंडळ ''म्हणजे ठेवी विमा महामंडळ कायदा 1961 च्या कलम 3 नुसार स्थापन करण्यात आलेले ठेव विमा व पत हमी महामंडळ होय.

20) ''डिफॉल्टर ''म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या कलम 73 सी.ए.नुसार डिफॉल्ट करणारी व्यक्ती.

21) ''विलफूल डिफॉल्टर'' म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या विविध आदेशांचे व मार्गदर्शक तत्वांचे हेतुपुरःसर उल्लंघन करणारा थकबाकीदार सभासद होय.

22) ''सहकार वर्ष'' म्हणजे दि.01 एप्रिल ते दि.31 मार्च मधील कालावधी.

23) ''कार्यक्षेत्र ''म्हणजे पोटनियम क्र.3 नुसार ज्या क्षेत्रामधील व्यक्तींना बँकेचे सभासद म्हणून स्विकारण्यात येते असे क्षेत्र.
24) ''सहकारी तत्वे'' म्हणजे 1995 मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी असोसिएशन यांनी तयार करुन आजतागायत वेळोवेळी सुधारणा केलेली सहकाराची तत्वे होय.
25) ''राज्य सरकार'' म्हणजे महाराष्ट्र राज्याचे सरकार होय.
26) ''कर्मचारी म्हणजे बँकेच्या सेवेमध्ये कार्यरत असलेली व बँकेशी करारान्वये नोकरीत असलेली व्यक्ती.
27) ''नोटीफिकेशन'' म्हणजे केंद्र व राज्य सरकारच्या अधिकृत गॅझेटमध्ये प्रसिध्द करण्यात आलेले नोटीफिकेशन.
28) ''बँक'' म्हणजे दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप.बँक लि.,संगमनेर
29) ''बी.आर.ॲक्ट'' म्हणजे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट 1949 (सहकारी बँकांना लागू केलेले)
30) कार्यलक्षी संचालक म्हणजे कार्यकारी संचालक अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा कोणत्याही अशा पदावर असणारी व्यक्ती जी संचालक मंडळाने मुख्य अधिकारी नेमली आहे.

5) **<u>उद्देश :-</u>**

बँकेचा मुख्य उद्देश ठेवीदारांचे हित जपणे हा असून सभासदांमध्ये सामाजिक व आर्थिक प्रगती साधणे व सदर प्रगती सहकाराच्या तत्वानुसार स्वतःसाठी व एकमेकांसाठी एकमेकांच्या मदतीव्दारे साधने.

1) सभासदांमध्ये काटकसर,स्वावलंबन,सहकार्याची भावना वृध्दिंगत करणे.
2) जनतेकडून रोखीने ठेवी स्विकारणे व त्यांचा विनियोग कर्ज देणे अगर गुंतवणुक करणे.तसेच स्विकारलेल्या ठेवी मागणी करताच मुदतीने चेक,डिमांड ड्राप्ट अथवा इतर कोणत्याही मार्गाने परत करणे.
3) कर्ज अथवा पैशाची उभारणी करणे.
4) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया / निबंधकांच्या परवानगीनुसार सभासदांना अथवा नाममात्र सभासदांना तारण घेवून अथवा तारणाशिवाय कर्ज अथवा उचल देणे आवश्यक असेल तेथे आर.बी.आय. / निबंधक यांची परवानगी घेतली जाईल.
5) हस्तांतरास वर्ग करण्यास योग्य अथवा अयोग्य असणाऱ्या हुंड्या देणे,स्विकारणे,खरेदी करणे, विकणे अथवा डिस्काऊंट करणे,वचन चिठ्ठया ,ड्राप्टस् कूपन्स,रेल्वे रसीदा,हमीपत्रे ,दाखले ,वॉरन्टस, शेअर्स, डिबेंचर्स व इतर सुरक्षापत्रे काढणे स्विकारणे,विकत घेणे,विकणे,स्विकारणे,डिस्काऊंट करणे,वसुल करणे इ.व्यवहार करणे.
6) हमीपत्रे (लेटर ऑफ क्रेडिट ),प्रवासी चेक्स (ट्रॅव्हलर्स चेक्स)व सर्क्युलर नोटस् देणे व मंजूर करणे.
7) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने विदेशी बँक चलन विकत घेणे,विदेशी चलनाचे सर्व व्यवहार करणे,तसेच सोने,चांदी लगड अथवा इतर स्वरुपात खरेदी करणे अथवा विकणे.
8) सर्व प्रकारच्या गुंतवणुकी,स्टॉक्स,शेअर्स,कर्जरोखे,बॉण्डस् वचनचिठ्ठया करारनामे , सिक्युरिटीज स्विकारणे,ताब्यात ठेवणे व या संबंधीचे कमिशन अंडर रायटींग आदी व्यवहार करणे.
9) ग्राहकांच्यावतीने बॉंण्डस् कर्जरोखे,वचनचिठ्या व इतर सर्व प्रकारचे दस्तऐवज (सिक्युरिटीज) विकत घेणे,विकणे.
10) सर्व प्रकारचे बॉंण्डस् कर्जरोखे,वचनचिठ्या व इतर प्रकारच्या मौल्यवान वस्तु ठेवीच्या स्वरुपात अथवा सुरक्षित तिजोरीत ठेवण्यासाठी स्विकारणे.

11) सुरक्षित तिजोरी घर (सेफ डिपॉझीट व्हॉल्ट)व तदनुषंगिक सेवा उपलब्ध करुन देणे.
12) सुरक्षा पत्रे व रोख रकमांची देवाणघेवाण करणे,पाठविणे.
13) कर्ज व उचलीचे व्यवहार / बोलणी करणे.
14) ग्राहकांच्या वतीने हमीपत्र (गॅरंटी),नुकसानभरपाई (इन्डेमनीटी) व्यवहार करणे.
15) राज्य सरकार,नगरपालिका,सहकारी व इतर संस्था,कॉर्पोरेशनस,संघटना,यांचे शेअर्स कर्जरोखे ,कर्ज,स्टॉक संबंधीचे विमा,हमी,व्यवस्थापन सहभाग इत्यादी बाबतचे व्यवहार करणे.
16) बँकेच्या हिताच्या व उपयुक्ततेच्या दृष्टीने वास्तू संपादन करणे,बांधणे तिची देखभाल करणे, वास्तूमध्ये बदल करणे अथवा तिचे रुपांतर करणे.
17) बँकेच्या पुर्ण अथवा अंशतः येण्यापोटी ताब्यात असलेल्या मालमत्तेची व्यवस्था करणे,विकणे अथवा तिची अन्य तऱ्हेने विल्हेवाट लावणे.
18) बँकेचे संचालक,कर्मचारी व सभासदांना सहकार व बँकिंग या विषयावर प्रशिक्षण देणे.
19) सहकार खाते व रिझर्व बँकेचे परवानगीने बँकेचे कार्यक्षेत्रामध्ये जनतेला बँकिंग सेवा उपलब्ध करुन देणाच्या दृष्टीने शाखा,विस्तारीत कक्ष,ए.टी.एम. अथवा उपकार्यालय उघडणे.
20) सहकारी खाते व रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने इतर कोणत्याही सहकारी संस्थेचा कारभार पूर्णपणे अथवा अंशतः ताब्यात घेणे अथवा व्यवस्थापन करण्यासाठी घेणे.
21) सभासदांच्या ,बँकेच्या आजी व माजी कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पूरक अशा संघटना,संस्था निधी,विश्वस्त निधी स्थापन करणे,स्थापन करण्यास मदत करणे अथवा त्यात सहभागी होणे,तसेच बँकेचे आजी व माजी कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या किंवा संबंधीत व्यक्तीस पेन्शन मंजूर करणे,विमा उतरविणे,धर्मदाय व परोपकार करण्याच्या उद्देशाने कार्यरत असणाऱ्या सार्वजनिक संस्थांना हमी देणे,वर्गणी देणे अथवा त्यांचे व्यवस्थापन पाहणे,ट्रस्टी म्हणून काम करणे.
22) सभासदांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व आर्थिक गरजा पूर्णकरण्यासाठी विविध योजना करुन कर्ज पुरवठा करणे.
23) लघु व कुटीर उद्योगधंद्यांना अर्थ पुरवठा व तंत्रज्ञान उपलब्ध करणे व स्वयंरोजगारी उद्योजकांना स्वतःचा उद्योगधंदा उभा करण्यास मदत करणे.
24) जेथे आवश्यक असेल तेथे रिझर्व बँकेच्या परवानगीने इतर बँका अथवा संस्था यांच्या " सहभाग कर्ज योजनेत"भाग घेऊन गरजूंना कर्ज पुरवठा करणे.
25) बँकींग रेग्युलेशन ॲक्ट1949(सहकारी बँकास लागू केलेले)चे कलम 6(1) नुसार इतर सर्व व्यवहार करणे.
26) विविध शासकीय संस्था,निमशासकीय संस्था व कायद्याच्या तरतुदीने अस्तित्वात येणाऱ्या संस्था इत्यादीसाठी अधिकृत प्रतिनिधी संस्था म्हणून निधी जमा करण्याचे काम करणे.
27) महाराष्ट्र को-ऑप.हौसिंग फायनान्स सोसायटी,आयुर्विमा महामंडळ,सरकारी/ निमसरकारी व इतर आर्थिक संस्था यांचेकडून पुनर्वित प्राप्त होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपाच्या अथवा कायम स्वरुपाचा कर्ज पुरवठा सहकारी गृहनिर्माण संस्थांना निबंधक व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या पुर्व परवानगीने करणे.
28) केंद्र / राज्य सरकारने सुचविल्यानुसार इतर कोणताही स्वरुपाचा व्यवसाय जो सहकारी बँका कायदेशीरपणे करु शकतात असा व्यवसाय करणे.
29) बँकेचे सभासद ,ठेवीदार,ग्राहक ,सार्वजनिक संस्था,इतर बँका व संलग्न संस्था यांना आर्थिक संगणक प्रणालीच्या आधारे आर्थिक,तांत्रिक कायदेशीर व तदनुषंगिक सेवा पुरविणे.

30) विमा कंपन्यांबरोबर करार करुन कॉर्पोरेट / रेफ्रल पध्दतीनुसार विमा व्यवसाय अंगीकारणे.
31) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने कोणत्याही प्रचलित कायद्यानुसार एक अथवा एकापेक्षा जास्त संलग्न संस्था उभारणेसाठी प्रवर्तक म्हणून काम करणे
32) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने क्रेडिट / डेबीट कार्ड व्यवसाय सुरु करणे.
33) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने मर्चंट बँकिंग अथवा डिपॉझीटरी सेवा,डिमॅट सेवा पुरविणे.
34) मा.निबंधक व रिझर्व्ह बँक यांच्या परवानगीने समान उदीष्टे असलेल्या सहकारी बँकांचे विलिनीकरण करुन घेणे,व्यवस्थापन पाहाणे,ताब्यात घेणे.
35) बँकेच्या उद्देशास अनुसरुन व बँकेच्या वाढीस पुरक अशा व्यवसायांपैकी आवश्यक असेल तो व्यवसाय करणे.
36) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार इतर कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय करणे.

## 6) <u>निधीः</u>

खालील साधनांनी निधी उभारता येतील.

### 1) भाग भांडवल

भाग भांडवल वृध्दीसाठी प्रेफरन्शीअल शेअर्स कॅपीटल उभारणे. प्रत्येकी रु.100/- दर्शनी किंमतीचे 200000 प्रेफरन्स शेअर्सनुसार रु.2,00,00,000/- (रु.दोन कोटी मात्र) याबाबत रिझर्व बँकेकडुन परवानगी घेऊन नियम ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास राहील. (मा.अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सह.संस्था,पुणे यांचेकडील आदेश जा.क्र.ना.बँका/सआ-१,संगमनेरमर्चंटबँक/पोनिदु/१८-/५१ दि.५-१-२०१८ अन्वये मंजुर)

2) प्रवेश फी
3) वर्गणी
4) ठेवी
5) कर्जे,कॅशक्रेडीट,ओव्हरड्राप्ट व उचल
6) देणग्या,अनुदान व मदत
7) नफा
8) बाहेरील व्यावसायिक कर्जे (ई.सी.बी.)
9) फ्लोटींग तारणी / विनातारणी बॉण्डस्
10) पुनर्वित्त,हमीपत्रे (लेटर ऑफ क्रेडिट)
11) नॉन कन्व्हर्टिबल डिबेंचर्स अथवा रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार इतर कोणतीही साधने.
12) मा.निबंधक व रिझर्व्ह बँक यांच्या परवानगीने वे़ळोवे़ळी उपलब्ध होणारी इतर साधने.

ब) बँकेने उभारलेले निधी ,बँकेने ठरविलेली उद्दिष्टये पुर्ण करण्यासाठी वापरण्यात येतील .

दिर्घमुदत (लॉंगटर्म सब ऑर्डीनेटेड) ठेव योजना (मा.अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सह.संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे यांचे जा.क्र.बँका/सआ-1/2018 दि.19.12.2018 व दि.1.1.2019 नुसार )

7) **<u>कर्ज उभारण्याची मर्यादा :-</u>**

कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा कायद्यानुसार,नियमानुसार नियंत्रित राहतील. मा.निबंधक यांचे परवानगीनुसार राहील.

8) **<u>भागभांडवलः-</u>**

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु.10,00,00,000/- (रु.दहा कोटी मात्र) इतके असुन ते रु.100/- दर्शनी किंमतीच्या 10,00,000 इतक्या भागात विभागलेले असेल.(मा.सहकार आयुक्त व निंबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश जा.क्र.ना.बँका/डि-4 /दि संगमनेरम.बँक/पोनिदु/2015 दिनांक 5-1-2015 अन्वये मंजूर)

9) **<u>सभासदत्व :-</u>**

बँकेमध्ये पुढील प्रकारचे सभासद असतील.

a) सर्वसाधारण सभासद i) क्रियाशील सभासद ii) अक्रियाशील सभासद
b) नाममात्र सभासद
c) सहयोगी सभासद

10) **<u>सामान्य सभासद :-</u>**

1) बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणारी अथवा व्यवसाय करणारी व ज्या व्यक्तीला बँकेच्या सेवांची गरज आहे व ती गरज बँक पुरवू शकत असेल तसेच ज्या व्यक्तीच्या कुठल्याही प्रकारच्या खात्यात रु.500/- शिल्लक असेल व त्या व्यक्तीचा व्यवसाय बँकेच्या व्यवसायाशी समांतर अथवा संघर्ष निर्माण करणारा नसेल तर अशा व्यक्तीस सर्वसाधारण सभासद म्हणून स्वीकारले जाईल.
2) बँकेचे सर्वसाधारण सभासद म्हणून खालील दिलेल्या यादीव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस सभासद म्हणून स्वीकारले जाणार नाही
   अ) सज्ञान असलेली व इंडियन कॉन्ट्रक्ट ॲक्ट 1872 च्या कलम 11 नुसार करार करण्यास पात्र असलेली व्यक्ती.
   ब) एकल व्यापारी संस्था.
   क) भारतीय भागीदारी कायदा 1932 नुसार नोंदणी झालेली भागीदारी संस्था.
   ड) अविभक्त हिंदू कुटूंब.
   इ) कंपनी कायद्यानुसार नोंदविलेली कंपनी अथवा अन्य प्रचलित कायद्यानुसार नोंदविलेली संस्था.
   ई) लिमिटेड लायबीलीटी पार्टनरशिप (मा.सहकार आयुक्त व निंबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश जा.क्र.ना.बँका/डि-4 /दि संगमनेरम.बँक/पोनिदु/2015 दिनांक 5-1-2015 अन्वये मंजूर)
   फ) **असोसिएशन ऑफ पर्सन (एओपी)**
   An association of persons or body of individuals whether incorporated or not.
   ( मा.अप्पर निबंधक (प्रशासन) सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे-1 यांचे कडील पत्र जा.क्र.ना.बँका/सआ-1/दिसंगमनेरमर्चंट्सबँक/पोनिदु/2019/ दिनांक 6.11.2019 अन्वये मंजुर)
   ग) स्थानिक स्वराज्य संस्था (लोकल ऑथॉरिटी)

ह) विश्वस्त संस्थांसाठी प्रचलित असलेल्या कायद्यानुसार नोंदविलेली सार्वजनिक विश्वस्त संस्था.

इ) मा.निबंधक यांनी संस्थेची वैशिष्टये व कार्ये यांचा विचार करुन परवानगी दिलेला कोणताही व्यक्तींचा वर्ग.

ई) राज्य / केंद्र सरकार.

3) बँकेचा कोणताही कर्मचारी सर्वसाधारण सभासदत्वास पात्र असणार नाही.सध्या जे कर्मचारी सभासद आहेत त्यांचे सभासदत्व त्वरीत संपुष्टात येईल.

4) अन्य कोणतीही सहकारी संस्था बँकेची सर्वसाधारण सभासद होण्यास पात्र असणार नाही.

11) **<u>सामान्य सभासदत्वासाठी अटीः-</u>**

1) खालील अटी पूर्ण करणाऱ्या अर्जदारास सामान्य सभासद म्हणून स्वीकारण्यास येईल.जर त्याने -

अ) विहीत नमुन्यामध्ये लिखित स्वरुपात अर्ज केला असेल.

ब) प्रवेश शुल्कापोटी रु.25/-अथवा संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल तितक्या रकमेचा भरणा केला असेल व किमान एका भागाची मागणी केली असेल.

क) कायदा ,नियम व बँकेचे पोटनियम यानुसार सर्व अटींची पूर्तता केली असेल.

2) मा.संचालक मंडळ सभेमध्ये त्याचा अर्ज मंजूर होऊन त्यास सभासद म्हणून स्वीकारण्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

3) जर कोणत्याही व्यक्तीने खालील अटींची पूर्तता केली नसेल तर ती सभासदत्व सभासद म्हणून स्वीकारण्यास अपात्र होईल.

अ) वयाची 18 वर्षे पुर्ण केली नसतील अशी व्यक्ती.

ब) अधिकृत न्यायालयाने दिवाळखोर अथवा दोषमुक्त न केलेल्या दिवाळखोर ठरविले असेल अशी व्यक्ती.

क) कोणत्याही गुन्ह्यासाठी शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती. अशा गुन्ह्यांमध्ये राजकीय स्वरुपाचे अथवा चारित्र्यहननाचे अथवा अप्रामाणिकपणाचे गुन्हे सोडून इतर गुन्ह्यांचा समावेश असेल अथवा शिक्षा होवून 5 वर्षाचा कालावधी लोटला असेल अशा व्यक्तींचा समावेश होणार नाही.

12) **<u>सभासदांचे हक्क व अधिकार :-</u>**

प्रत्येक सर्वसाधारण सभासदांचे पुढील हक्क प्राप्त होतील.

1. सभासदास कायदा,नियम व पोटनियम यानुसार लागू असलेले सर्व हक्क राहतील. परंतू जोपर्यंत सभासद कायदा,नियम व पोटनियम यानुसार आवश्यक तेवढे भाग खरेदी करत नाही किंवा त्यासाठी आवश्यक रकमेचा भरणा करत नाही. तोपर्यंत त्यास सभासदत्वाचे हक्क उपभोगता येणार नाहीत. त्याशिवाय बँकेने किमान भागभांडवलाची मर्यादा वाढविली व त्याप्रमाणे सभासदास मागणी नोटीस पाठवून आवश्यक तेवढा कालावधी दिल्यास सभासदत्वाचे हक्क बजावन्याकरीता त्या रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

2. बँकेच्या सभासदांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे-

अ) अगोदरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे.

ब) अगोदरच्या सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान एकदा बँकेच्या सेवांचा लाभ घेणे.

जो सभासद पोटनियमातील तरतूदीस अनुसरुन अगोदरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहिला नसेल आणि अगोदरच्या सलग पाच वर्षामध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान बँकेच्या सेवांचा लाभ घेतला नसेल अशा सभासदास अक्रियाशील सभासद केल्याबाबतचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर 30 दिवसांचे आत कळविण्यात येईल अथवा अशा सभासदांची यादी बँक मुख्य कार्यालय व शांखामध्ये 30 दिवसांचे आत सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

जो अक्रियाशील सभासद नंतरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणार नाही आणि नंतरच्या सलग पाच वर्षामध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान एकदा बँकेच्या सेवांचा लाभ घेणार नाही.त्याला कायद्याच्या कलम 35 नुसार निष्कासित करण्यात येईल.

ज्या सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून संबोधले जाईल त्याला परत क्रियाशिल सभासद होईपर्यंत बँकेच्या कोणत्याही सवलतीचा लाभ मिऴणार नाही.

सभासद क्रियाशील आहे अथवा अक्रियाशील आहे यामध्ये मतभेद झाल्यास याबाबतचे अपील निबंधकांकडे अशी सूचना मिऴाल्यापासून 60 दिवसांचे आत करता येईल.

कायद्यामधील सदर दुरुस्ती प्रसिध्द झाल्यानंतर लगेचच ज्या बँकांची निवडणूक होणार आहे अशा बँकांच्या सर्व सभासदांना जोपर्यंत ते अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकृत केले जात नाही तोपर्यंत त्या सभासदास मतदानाचा अधिकार राहील.

13) **<u>सभासदत्वाचा अर्ज व त्याबाबतची कार्यवाहीः-</u>**

अ) सर्वसाधारण सभासदत्वासाठी अर्जदाराने बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात रु.25/-इतक्या प्रवेश फी सहित अर्ज सादर केला पाहिजे.अर्जदाराने त्या बरोबरच बँकेच्या एक भागाची रक्कम रु. 100/-प्रमाणे 10 भांगाची रक्कम रुपये 1000/- याप्रमाणे अर्ज सादर करतांना भरली पाहिजे.

ब) जे अर्ज सर्व दृष्टीने पूर्णपणे भरलेले आहेत व योग्य त्या रकमेचा भरणा केलेला आहे , अशा अर्जावर बँकेतर्फे अर्ज मिऴालेपासून 90 दिवसांचे आत निर्णय घेतला जाईल व असा निर्णय घेतल्यापासून 60दिवसांचे आत तो अर्जदारास कऴविला जाईल.

14) **<u>क्रियाशील सभासदः-</u>**

क्रियाशील सभासद म्हणजे अशी व्यक्ती जीला बँकेच्या पोटनियमातील तरतुदीनुसार सर्वसाधारण सभासद म्हणून प्रवेश दिला आहे आणि अ) जो सभासद अगोदरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहिला आहे.

ब) ज्या सभासदाने अगोदरच्या सलग पाच वर्षामध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान एकदा बँकेच्या सेवांचा लाभ घेतला आहे.

15) **<u>क्रियाशील सभासद होण्यासाठीच्या अटीः-</u>**

क्रियाशील सभासद होण्यासाठी बँकेच्या सामान्य सभासदास पुढील तक्त्यानुसार बँकेच्या ठेवींवर आधारित अटींची पूर्तता करावी लागेल.-

| अ. क्र. | बँकेच्या ठेवी (कच्ची यादी तयार करणेच्या दिवशी) | किमान भाग भांडवल | किमान ठेवींची आवश्यकता | कर्ज |
|---|---|---|---|---|
| 1 | रु.100 कोटींपर्यंत | रु.500/- आणि | रु.3000/- किंवा | रु.50000/- |
| 2 | रु.100 कोटींपेक्षा जास्त ते रु.500 कोटींपर्यंत | रु.1000/- आणि | रु.5000/- किंवा | रु.50000/- |
| 3 | रु.500 कोटी व त्यावरील | रु.2000/- आणि | रु.7000/- किंवा | रु.100000/- |

**<u>तरतूद 1ः-</u>**

ठेव धारक म्हणजे ज्या सामान्य सभासदाची बँकेच्या सर्वप्रकारच्या ठेव खात्यांमधून किमान सरासरी रक्कम रु.5,000/- इतकी एकूण ठेव स्वतःच्या नांवे अथवा ज्या संस्थेचा मालक /संचालक /पदाधिकारी/ट्रस्टी म्हणून प्रतिनिधित्व करत असेल त्या संस्थेच्या /कंपनीच्या /सोसायटीच्या /ट्रस्टच्या खात्यांमध्ये आहे अशी व्यक्ती.

**<u>तरतूद 2ः-</u>**

कर्जदार म्हणजे असा सामान्य सभासद की बँकेच्या कोणत्याही प्रकारच्या कर्ज सवलतीची किमान रु.50,000 ची मंजूर सुविधा वापरत आहे .

16) **<u>क्रियाशील सभासदांचे हक्क ः-</u>**

1) बँकेच्या संचालक मंड़ळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार.तथापि कोणत्याही व्यक्तिगत सभासदास प्रतिनिधीव्दारे मतदान करता येणार नाही.
   तथापि कोणत्याही संस्था,कंपनी,भागीदारी फर्म,नोंदणीकृत विश्र्वस्त संस्था यांना संचालक मंड़ळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करणेसाठी प्रतिनिधीची नेमणूक करता येईल.
2) सामान्य सभासदांचे सदर पोटनियमामध्ये उल्लेख केलेले सर्व अधिकार क्रियाशील सभासदास राहतील.

17) **बँकेच्या निवडणूकांमध्ये मतदान करण्याचा अधिकार ः-**

1) फक्त क्रियाशील सभासदांना त्यांनी कितीही भागभांडवल धारण केले असले तरी एका मताचा अधिकार राहील.

2) क्रियाशील सभासद व्यक्तीस स्वतः मतदान करण्याचा अधिकार राहील. संस्था, कंपनी, भागीदारी फर्म,नोंदणीकृत विश्र्वस्त संस्था यांना संचालक मंडळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करणेसाठी प्रतिनिधी म्हणून भागीदार ,संचालक किंवा पदाधिकारी यांची नेमणूक करता येईल.
3) क्रियाशील सभासदास कायद्याच्या कलम 73सीए(1)(I)मध्ये वर्णन केल्यानुसार डिफॉल्टर झाल्यास मतदान करता येणार नाही.

18) **<u>सहयोगी सभासदत्व :-अधिकार व जबाबदाऱ्याः-</u>**

1) बँकेचे भाग एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नांवे संयुक्तरित्या घेता येतील.
2) सहयोगी भागधारकाचे बाबतीत कोणच्याही मृत्यूनंतर हयात असलेल्या व्यक्ती संयुक्त /व्यक्तीगत भागधारक म्हणून गणल्या जातील.
3) सहयोगी भागधारक संबंधित भागांबाबतच्या देण्यास संयुक्तपणे विभक्तरित्या जबाबदार राहतील.
4) सहयोगी भागधारकाचे बाबतीत भाग दाखल्यावर ज्याचे प्रथम नाव लिहिले असेल त्याला सभासदांचे सर्व हक्क प्राप्त होतील व तो वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस मिळण्यास व जाहीर केल्यानुसार लाभांश मिळण्यास पात्र राहील.
5) ज्यावेळेस क्रियाशिल सभासदाने बँकेचे भाग एकापेक्षा जास्त व्यक्तीबरोबर संयुक्त रित्या धारण करत असेल त्यावेळेस ज्या व्यक्तीचे नाव प्रथम असेल त्या व्यक्तीस ,मतदानाचे अधिकार प्राप्त होतील.पण त्या व्यक्तीच्या गैरहजेरीत ज्या व्यक्तीचे नाव दुसऱ्या नंबरवर असेल त्या व्यक्तीस मतदानाचे अधिकार असतील पहिल्या दोघांच्या अनुउपस्थितीत हाच नियम प्रत्येक पुढील नाव असलेल्या व्यक्तीस लागू होईल. मात्र अशी व्यक्ती अज्ञान असाता कामा नये.

19) **<u>नाममात्र सभासद :-</u>**

1) एखादी व्यक्ती अविभक्त कुटूंबातील सहभागीदार असेल अथवा कर्जदार सभासदास जामीनदार म्हणून राहणार असेल अथवा एखाद्या व्यक्तीस तात्पुरती गरज भागविण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार कर्ज घ्यावयाचे असेल त्यास विहीत नमुन्यात अर्ज व विनापरतीची प्रवेश फी रु.30/- भरल्यानंतर,परंतू कर्जदार व जामीनदार म्हणून असलेली सर्व देणी परत केल्यानंतर आपोआप त्याचे नाममात्र सभासद्त्व संपुष्टात येईल या अटीवर आणि जो बँकेच्या कायक्षेत्रामध्ये कार्यरत आहे अशा व्यक्तीस नाममात्र सभासद करुन घेता येईल .
2) बँकेच्या कर्मचाऱ्यानाही नाममात्र सभासद होता येईल. व त्याला नाममात्र सभासदांप्रमाणे फायदे मिळतील.
3) नाममात्र सभासदत्व पुढील बाबींना पात्र असणार नाही.
   अ) भाग दाखला देणे.
   ब) लेखापरीक्षण झालेली आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल मिळणे.
   क) वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभांना हजर राहणे,भाग घेणे,मतदान करणे.
   ड) लाभांश मिळणे.
   इ) संचालक मंडळाच्या निवडणूकीस उभे राहणे व मतदान करणे.

20) **<u>सभासदांची जबाबदारी :-</u>**

सभासदांनी घेतलेल्या भागांच्या रकमेइतकीच त्याची जबाबदारी मर्यादीत राहील. माजी सभासदांची जबाबदारी ज्यावेळी त्यांचे सभासदत्व रद्द झाले त्यावेळेपासून दोन वर्षापर्यंत राहील. तसेच मयत सभासदाचे मालमत्तेवर त्याच्या जबाबदारीपोटी दोन वर्षेपर्यंत बोजा राहील.

21) **<u>सभासदांची ओळख (के.वाय.सी.नॉर्मस् लागू करणेबाबत ):-</u>**

बँकबरोबर होणाऱ्या सर्व व्यवहारांचे बाबतीत सभासदांची ओळख असणे आवश्यक आहे.सदर ओळखीसाठी सर्व व्यक्तिगत सभासदांनी रिझर्व्ह बँकेने लागू केलेल्या आपला ग्राहक जाणा (के.वाय.सी.)या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करणे आवश्यक आहे.सध्या असलेल्या सभासदांनी सुध्दा सदर बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सभासदांची ओळख बँकेमधील अधिकारी किंवा अधिकृत अधिकारी करतील. यासाठी सभासदांना बँकेकडून पहिले एक ओळखपत्र निशुल्क दिले जाईल. ज्यावेळी सभासदास त्याचा कोणत्याही हक्क बजावयाचा असेल.उदा. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे व मतदान करणे,लाभांश पत्र घेणे,कर्जदार /जामिनदार म्हणून करार करणे,संचालक मंडळाच्या निवडणूकीत मतदान करणे इत्यादी किंवा अन्य कोणत्याही हक्क जो बँक वेळोवेळी प्रसिध्द करेल त्यावेळी हक्क बजावताना ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.

संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी भारताच्या निवडणूक आयोगाने निश्चित केलेले कोणतेही ओळखपत्र सादर करता येईल.

सभासदास ओळखपत्र सादर करणे अशक्य झाल्यास त्यावेळी त्या कारणापुरता त्याचा हक्क बँक नाकारु शकेल.

ओळखपत्र हरविल्यास अथवा गहाळ झाल्यास बँकेकडून ओळखपत्राची दुसरी प्रत मिळेल तथापि अशा प्रतीस बँकेने वेळोवेळी ठरविलेले नाममात्र शुल्क आकारले जाईल.
टीप :- सदर पोटनियमामध्ये अधिकृत अधिकारी म्हणजे बँकेने सदर कामकाजांसाठी नेमलेली व्यक्ती /नेमलेल्या व्यक्ती होय.

22) **<u>सभासदत्वाचा राजीनामा देणे:-</u>**

1) सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देऊन स्वतःचे भाग भांडवल संचालक मंडळाचे संमत्तीने परत घेवू शकेल. परंतू तसे करण्यापुर्वी त्याचेकडे कर्ज व जामिनकीपोटी येणे असलेल्या सर्व रकमांची परतफेड झाली असली पाहीजे. तसेच सभासदत्वाचा राजीनामा देताना किमान (1) वर्षाचा कालावधी झालेला असावा व त्यासाठीची सूचना किमान 1 महिना अगोदर देणे आवश्यक आहे. कोणत्याही सहकारी वर्षात अशा तऱ्हेने परत करण्यात येणारे भांडवल त्यापुर्वीच्या दि.31 मार्च रोजी असलेल्या वसूल भाग भांडवलाचे 10% पेक्षा जास्त असणार नाही. अशा परत करण्यात येणाऱ्या भाग भांडवलाची किंमत त्या अगोदरचा वर्षाच्या मुल्यांकनानुसार येणारी किंमत किंवा दर्शनी किंमत यापैकी कमी असणारी रक्कम असेल.
2) ज्या सभासदांनी राजीनामा देऊन भाग भांडवल काढून घेतले आहे ,अशा सभासदांना राजीनामा दिल्यापासून किमान 1 वर्षापर्यंत परत बँकेचे सभासदत्व मिळण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**23) सभासदत्वाचे निष्कासन करणेः-**

1) बँकेच्या कोणत्याही सभासदाचे निष्कासन हे कायदा,नियम व त्यासाठीच्या सर्वसाधारण सभेतील उपस्थित व मतदान करणाऱ्या सभासदांमधील 3/4 सभासदांच्या बहुमताने यासंबंधित पारीत झालेल्या ठरावानुसार राहील. कोणत्याही सभासदाच्या बँकेस अपायकारक ठरणाऱ्या व हानी पोहचवू शकणाऱ्या कृत्यांमुळे बँकेच्या कामकाजात अडचणी येत असतील तर अशा सभासदाचे निष्कासन बँक करेल.
2) निष्कासन झालेल्या सभासदास त्याची बाजू कायदा व नियम यानुसार मांडता येईल.व मा.निबंधकाचे मंजूरीनंतरच संबंधित सभासदाचे सभासदत्व संपुष्टात येईल.
3) निष्कासित झालेल्या कोणत्याही सभासदास निष्कासन झाल्यापासून 1 वर्षांचा कालावधी पर्यंत पुनःश्च सभासदत्व दिले जाणार नाही.

**24) सभासदत्व संपुष्टात येणेः-**

पुढील बाबतीत सभासदत्व संपुष्टात येईल.

अ) व्यक्तिगत सभासदाचा मुत्यू झाल्यास किंवा भागीदारी संस्था,कंपनी व इतरांच्या बाबतीत विसर्जन अथवा दिवाळखोरी झाल्यास.
ब) नादारी जाहीर झाल्याने अथवा कायदेशीर तरतूदीने सभासद राहण्यास लायक न ठरल्यास
क) सर्व भागांचे दुसऱ्याचे नावावर हस्तांतरण केल्यास.(सदर नियम हा ज्या बँकांचे नक्तमूल्य ऊणे नाही अशाच बँकांना लागू होईल.)
ड) राजीनामा दिल्याने किंवा सभासदत्व कमी करण्याची मागणी मान्य झालास.
इ) सभासदाचे कायदा व नियमानुसार निष्कासनाझाल्यास अशा निष्कासनामुळे भागांची रक्कम जप्त करता येवू शकेल.
फ) कायदा ,नियम व पोटनियम यानुसार अपात्र ठरल्यास.
ग) बँकेने Right of lien चा अधिकार वापरल्यास.

**25) भाग दाखलाः-**

1) प्रत्येक व्यक्ती सभासद म्हणून स्वीकृत झाल्यावर त्या व्यक्तीने घेतलेल्या भागाबद्दल भाग दाखला (विना शुल्क )मिळण्यास पात्र होईल. भाग दाखल्यावर घेतलेल्या भागांचा उल्लेख असेल व त्यांचे अनुक्रमांक असतील,भाग दाखल्यावर बँकेचे अध्यक्ष अथवा अधिकार दिलेले संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असतील.तसेच बँकेची मोहोर (सील)त्यावर असेल.
2) जर कोणत्याही भाग दाखला हरवला,गहाळ झाला ,नष्ट झाला तर त्याऐवजी संचालक मंडळाने ठरविलेल्या दरानुसार शुल्क भरल्यानंतर दुसरा भाग दाखला दिला जाऊ शकेल. परंतू त्यासाठी सभासदाने भाग दाखला गहाळ झाल्याबाबतचा ,हरवल्याबाबतचा,नष्ट झाल्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.परंतू सभासदाने त्यासाठी इंडेमनिटी बॉण्ड देणे आवश्यक आहे.

**26) <u>नामांकन :-</u>**

सभासदास आपले पश्चात बँकेतील हक्क, जबाबदारी घेणेसाठी वारसाची नेमणूक करता येईल. वारस नेमणेबाबत विहीत नमुन्यात अर्ज केला पाहिजे व त्याची नोंद बँकेचेनोंदणीकृत कार्यालयात ठेवलेल्या वारस नोंदणी रजिस्टरमध्ये झाली पाहिजे.जर वारस बँकेचा सेवक असेल तर मा.संचालक मंडळाची पूर्व परवानगी घेतली पाहीजे. कोणत्याही वेळी अगोदर नोंदलेले वारस पत्र मागे घेऊन नवीन वारस पत्र दाखल करता येईल मात्र त्यासंबंधीची लेखी माहिती बँकेस दिली पाहिजे. तसेच नवीन वारस पत्र दाखल करतांना मा.संचालक मंडळाने ठरविलेल्या शुल्क भरावे लागेल.

**27) <u>सभासदाचा मुत्यू :-</u>**

सभासदाचे मुत्यूनंतर त्या सभासदाच्या भागांची रक्कम नेमलेल्या वारस / वारसांना मृत्यू झालेपासून 36 महिन्यांचा आत दिली पाहिजे.वारस नेमले नसेल तर मा.संचालक मंडळास जो त्याचा कायदेशीर वारस आहे अथवा जो मृत्यू पावलेल्या सभासदाचा कायदेशीर प्रतिनिधी आहे,अशी खात्री असेल त्यास बँक आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन रक्कम देईल. अशावेळी संचालक मंडळाने ठरविलेल्या अटीनुसार योग्य तो इंडेमनिटी बॉण्ड द्यावा लागेल.

**<u>28) माजी सभासदांची जबाबदारी व मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता :-</u>**

1) माजी सभासदांची जबाबदारी अथवा मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता येणे असलेल्या रकमेपोटी पुढीलप्रमाणे राहील.

   अ) माजी सभासदांच्या बाबतीत ज्या दिवशी त्याचे सभासदत्व संपुष्टात आले त्या दिवसापासून 2 वर्षे

   ब) मृत्यू पावलेल्या सभासदाचे बाबतीत त्याचा मृत्यूच्या दिनांकापासून पुढे दोन वर्षाकरिता.

2) ज्यावेळी कायद्यानुसार बँकेस बँकिंग व्यवसाय गुंडाळण्याचा आदेश मिळेल त्यावेळी माजी सभासदांची जबाबदारी व आदेशाचे तारखेपुर्वी दोन वर्षांचे आत मृत्यू पावलेल्या सभासदाची मालमत्ता अवसायनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहील. परंतू सभासदाची जबाबदारी ही त्याचे सभासदत्व संपुष्टात येण्याच्या दिवशीची व मृत्यू पावलेल्या सभासदाची मृत्यूच्या दिनांकाचे वेळी असलेली राहील.

**29) <u>सभासदांचे भाग भांडवल,लाभांश व ठेवींवरील बँकेचा हक्क :-</u>**

सभासदाचे किंवा माजी सभासदाचे बँकेचे येणे असेल तर त्यापोटी बँकेत सभासदाचे असलेल्या भागांवर,लाभांशावर व ठेवींवर बँकेचे प्रथम अग्रहक्क व बोजा राहील. बँक केव्हाही त्याच्या जबाबदारीपोटी त्याला देय असलेली र्क्कम परस्पर वळती करुन घेऊ शकेल.

30) **भाग वर्ग करणेबाबत. :-**

एखाद्या सभासदास त्याने धारण केलेले एक किंवा अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाच्या नावे वर्ग करता येईल. मात्र ज्या सभासदाचे नावावर भाग वर्ग झाले असतील त्याचे नाव भागांच्या रजिस्टरमध्ये नोंदले गेलेशिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही.तसेच यासाठी शुल्क म्हणून संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल ती र्क्कम भरावी लागेल. (सध्या रु.25/-)

खालील कारणासाठी भाग वर्ग करणे नाकारले जाईल.

अ) जर सभासदावर कर्जाचा बोजा / जामिनकीची जाबबदारी असेल तर.
ब) जर भाग वर्ग करणे बँकेच्या हितसंबंधास हानीकारक असेल तर.
क) ज्या व्यक्तीच्या नावावर भाग वर्ग करावयाचे असतील ती व्यक्ती पोटनियम क्र.11 मधील तरतूदी पुर्ण करत नसली तर.
ड) जर सभासदास धारण केलेले सर्व भाग वर्ग करावयाचे नसतील तर.

31) **सर्वसाधारण सभा :-**

1) बँकेच्या सामान्य क्रियाशील व अक्रियाशील सभासदांचा समावेश साधारण सभेत होईल.
2) कायदा व नियम यांना अधिन राहून बँकेचे व्यवहाराबाबतचे सर्व अंतीम अधिकार सर्वसाधारण सभेकडे राहतील.
3) सर्वसाधारण सभा दोन प्रकारच्या असतील. अ)वार्षिक साधारण सभा ब) विशेष साधारण सभा.

32) **सर्वसाधारण सभेची कामे व अधिकारः-**

बँकेचे संचालक मंडळ ठरावाव्दारे दरवर्षी आर्थिक वर्ष संपलेनंतर सहा महिन्यांचे आत वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करेल.सदर सभा खालील कामकाजाकरीता बोलावली जाईल.

1) मागील साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2) संचालक मंडळाच्या बँकेच्या कार्याबद्दलचा वर्ष अखेरच्या अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.
3) लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
4) लेखपरीक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
5) मागील लेखापरीक्षण झालेल्या अहवालाचा दोष दुरुस्ती अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
6) कायदा व नियम यास अनुसरुन नफा वाटणीस मान्यता देणे व लाक्षांश जाहीर करणे.
7) पुढील वर्षाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि प्रगतीच्या तक्त्याची माहिती घेणे.
8) बँकेचा लॉंग टर्म पर्सपेक्टीव्ह प्लॅन व वार्षिक कार्यवाहीचा अहवाल यांस मान्यता देणे.
9) सभासदांचे निष्कासन करणे -जर असेल तर.
10) पोटनियम दुरुस्ती करणे - जर असेल तर.
11) कायद्यातील तरतूदीस आधीन राहून लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन

ठरविणे.

12) सेवकांची रचना व नेमणूकीस मान्यता देणे - जर असेल तर.
13) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जांबाबत माहिती घेणे.
14) बँकेच्या स्वतःच्या उपयोगितेकरीता खरेदी केलेली जमीन किंवा इमारत,इमारतीचे बांधकामास मान्यता.
15) बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षण याकरिता बँकेने केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे. याबाबतच्या पुढील वर्षाच्या योजनेची नोंद घेणे.
16) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ठेवण्यात येणारे अन्य कोणतेही विषय.

33) **<u>विशेष साधारण सभाः-</u>**

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळाच्या आदेशानुसार केव्हाही अथवा मा.निबंधक यांचेकडील सूचना मिळालेपासून अथवा 250 किंवा एकूण सभासदांच्या 1/5 सभासदांच्या सह्याने आलेल्या लेखी विनंतीनुसार 30 दिवसांमध्ये विशेष साधारण सभा बोलवतील. विशेष साधारण सभेमध्ये फक्त सूचनेमध्ये दिलेल्या विषयांवर विचार केला जाईल.

34) **<u>वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेची सूचना :-</u>**

1) वार्षिक साधारण सभा 14 दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सूचना देवून बोलावली जाईल.

2) विशेष साधारण सभा 7 दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सूचना देऊन बोलावली जाईल
3) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसबरोबर उपस्थितीबाबतचे सही न केलेले सर्टिफिकेट पाठविले जाईल.सदर सर्टिफिकेटवर वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी बँकेने नेमलेले अधिकृत अधिकारी सही करतील व असे सर्टिफिकेट उपस्थितीबाबतचा निर्णायक पुरावा असेल.
4) वार्षिक साधारण सभेची व विशेष सर्वसाधारण सभेची सूचना नोंदणीकृत कार्यालयात,नोटीस बोर्डावर तसेच बँकेच्या शाखांमध्ये लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद,नफातोटा पत्रक, लेखापरीक्षकांचा मागील आर्थिक वर्षासंबंधीचा दाखला व संचालक मंडळाचा अहवाल यासहीत लावली जाईल.आणि स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केले जाईल. तसेच संचालक मंडळाची निवडणूक असल्यास त्यासंबंधी व पोटनियम दुरुस्ती असल्यास त्यासंबंधीची सूचना त्यासोबत लावली जाईल.
5) उपरोक्त साधारण सभेची सूचना क्रियाशील ,अक्रियाशील सभासदांना पुढील पध्दतीने पाठविली जाईल.
   अ) स्थानिक वाटप पध्दतीने किंवा
   ब) पोस्टाने
   क) ई - मेलव्दारे
   ड) कुरिअरव्दारे
   इ) बँकेच्या सर्व शाखांव्दारे

6) सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये सभेची जागा,तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. तसेच सूचनेमध्ये गणपूर्ती अभावी तहकूब झालेल्या सभेची तारीख ,जागा व वेळ याचाही उल्लेख असला पाहिजे.
7) कोणत्याही सर्वसाधारण सभेची सूचना मिळाली नाही ,हे सभा तहकूब करण्यासाठी अथवा पुढे ढकलणेसाठी पुरेसे कारण ठरणार नाही.
8) सर्वसाधारण सभेची सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने दिली जाईल.

35) **वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेची गणपुर्ती :-**

1) कोणत्याही साधारण सभेस एकूण सभासदामधील 1/5सभासद किंवा 300 सभासद यापैकी जी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल.
2) साधारण सभेचे कामकाज सभेच्या वेळेस गणपूर्ती न झाल्यास चालविण्यात येणार नाही.
3) ठरविण्यात आलेल्या वेळेस गणपूर्ती झाली नाही तर अशी सभा तहकूब करण्यात येईल आणि ती अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
4) सभेच्या दरम्यान कोणत्याही वेळी असे लक्षात आले की,गणपूर्तीसाठी आवश्यक तेवढे सभासद उपस्थित नाही तर अध्यक्ष किंवा सभेचे अध्यक्ष स्थान भूषविणारी व्यक्ती अशी सभा तहकूब करेल आणि उर्वरित कामकाज नेहमीच्या पध्दतीने तहकूब सभेत पूर्ण केले जाईल.
5) वरील क्रमांक 3 व 4 नुसार तहकूब केलेली सभा त्याचदिवशी अथवा अन्य कोणत्याही दिवशा,कोणत्याही ठिकाणी व कोणत्याही वेळेस 7 दिवसांचे आत अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे घेण्यात येईल.
6) तहकूब झालेल्या सभेमध्ये सभेच्या सूचनेवर असलेल्या विषयांव्यतिरिक्त कोणत्याही विषयाचे कामकाज चालविले जाणार नाही.
7) तहकूब झालेल्या सभेमध्ये गणपूर्ती नसेल तरीही सभेचे नियमित कामकाज पार पाडता येईल.
8) विशेष सर्वसाधारण सभेसाठी एकुण सभासदांमधील 1/5 सभासद किंवा 250 सभासद यापैकी जी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल.

36) **सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष :-**

संचालक मंडळाचे अध्यक्ष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष असतील. त्यांचे गैरहजेरी उपाध्यक्ष आणि दोघांचेही गैरहजेरीत हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासद आपल्यापैकी एकाची निवड सभेच्या अध्यक्षपदासाठी करतील.

37) **ठराव :-**

ज्याबाबत विशिष्ट तरतूदी कायदा,नियम व पोटनियम यात असतील असे विषय वगळता इतर बाबतीत ठराव मताधिक्क्याने मंजूर करण्यात येईल.

38) **सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त :-**

सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभा झाल्यापासून 30 दिवसांचे आत त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे.सदर इतिवृत्तावर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या

कराव्यात. अशा प्रकारचे सह्या केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अधिकृत पुरावा म्हणून समजले जाईल.

**39) <u>संचालक मंडळ :-</u>**

1) बँकेचे कार्यकारी व्यवस्थापन बँकेच्या ठेवींनुसार आवश्यक तितक्या संचालकांच्या संचालक मंडळाकडे राहील.त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | बँकेच्या ठेवी | सर्व साधारण | एस.सी. / एस.टी. | महिला | ओ.बी सी. | डीटी / एनटी व्हिजेएनटी/ एसबीसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रु.100 कोटीपर्यंत | 7 | 1 | 2 | 1 | 1 | 12 |
| 2 | रु.100 कोटींपेक्षा जास्त ते रु.500 कोटींपर्यंत | 12 | 1 | 2 | 1 | 1 | 17 |
| 3 | रु.500 कोटी व त्यावरील | 12 | 1 | 2 | 1 | 1 | 17 |

**2) <u>2 राखीव जागा - तज्ञ संचालकांसाठी</u>**

बँकेच्या निवडून आलेल्या संचालक मंडळामध्ये 2 तज्ञ संचालक नसतील तर असे 2 तज्ञ संचालक क्रियाशील सभासदांमधून स्वीकृत केले जातील.सदर संचालकांना बँकेच्या व्यवस्थापनाच्या मधल्या फळीत काम केल्याचा किमान 10 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे किंवा बँकिंग संबंधीची व्यावसायिक शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. यासाठी
व्यावसायिक शिक्षण म्हणजे सी.ए./ आय.सी.डब्यू.ए./सी.एस./वकील निवृत्त बँक अधिकारी /बँकिंग संबंधी प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक की,ज्यांना प्रशिक्षण देण्याचा किमान 10 वर्षांचा
अनुभव आहे. (रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक क्र.P.C.B.CIR.POT39/09.103.01/2001-02, dt. 05/04/2002)

3) अधिनियमाच्या कलम 73AAA मधील तरतुदीनुसार बँकेला कार्यकारी संचालक नियुक्त करता येईल.

**स्पष्टीकरण :-**

अ) संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशील सभासदांमधील अनुसुचित जाती /अनुसुचीत जमातीसाठी राखीव असेल. कायद्याचे कलम 73 अअ नुसार बँक कार्यलक्षी संचालक स्विकृत करु शकते.
ब) संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशील सभासदांमधील इतर मागासवर्गीयांसाठी राखीव असेल.
क)संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशील सभासंदामधील भटक्या जाती ,विमुक्त जाती,विशेष मागास जमाती यासांठी राखीव असेल.

**<u>टीप :-</u>**वरील राखीव जागांपैकी संचालक मंडळावर कोणत्याही जागेसाठी व्यक्ती निवडून आली नाही तर अशी जागा बँकेच्या निवडणूक लढविण्यास पात्र असलेले क्रियाशील सभासदांमधून कायदा कलम 73ब(3) नुसार नियुक्तीव्दारे भरली जाईल.

ड) संचालक मंडळामधील 2 जागा क्रियाशील महिला सभासदांसाठी कायदा कलम 73 सी नुसार राखीव असेल.

(टीप :-क्रियाशील महिला सभासद सदर निवडणूक लढविण्यास पात्र राहील. जर अशा जागेवर महिला संचालक निवडून आल्या नाहीत तर कायद्याच्या कलम 73(सी)2 नुसार दोन पात्र महिला संचालक नियुक्त करण्यात याव्यात. )

(4) **सेवक संचालक नेमणे बाबत** : जेथे संस्थेच्या स्थायी वेतनी कर्मचा-यांची संख्या ही पंचवीस किंवा त्यापेक्षा अधिक असेल तेथे समिती मध्ये (एका) जर ती समिती अकरापेक्षा अधिक नसतील इतक्या संदस्यांची मिळुन बनलेली असेल तर त्या संस्थेच्या कर्मचा-यांच्या एका प्रतिनिधीचा समावेश असेल आणि (दोन) जर ती समिती अकरा पेक्षा अधिक असलेल्या परंतु एकवीस पैंक्षा अधिक नसलेल्या सदस्यांची मिळुन बनलेली असेल तर त्या संस्थेच्या कर्मचा-यांच्या दोन प्रतिनिधींचा समावेश असेल.

सेवक संचालकांना संस्थेच्या पदाधिका-यांच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही. तसेच समिती सभेच्या इतर विषयांसंबंधी ठरावामध्येही त्यांना मत देता येणार नाही. ते आपले म्हणणे मांडु शकतील तथा अभिप्राय नोंदवु शकतील.

कर्मचा-यांच्या अशा प्रतिनिधींची निवड ही महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम किंवा महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम 1971 अन्वये मान्यता दिलेल्या संघाकडुन किंवा संघाकडुन संस्थेच्या कर्मचा-यामधुन करण्यात येईल. तेथे असा कोणताही संघच अस्तित्वात नसेल किंवा तेथे एखादा संघ हा मान्यताप्राप्त आहे किंवा नाही यासह अशा मुद्याशी संबंधीत विवाद असेल तेव्हा संस्थेचे कर्मचारी आपल्या मधुन विहित केलेल्या रितीने अशा कर्मचा-यांच्या प्रतिनिधीची निवड करतील.निलंबीत असलेला कोणताही कर्मचारी हा या परंतुकान्वये समितीचा सदस्य म्हणुन निवड केला जाण्यास किंवा निवडुन दिला जाण्यास किंवा सदस्य म्हणुन राहण्यास पात्र असणार नाही. **(मा.अप्पर सहकार आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्रराज्य,पुणेयांचेकडीलज्ञापन/जा.क्र.ना.बँका/सआ-१/दिसंगमनेरमर्चंटबँक/पोनिदु/२०१६, दि.३०.१२.२०१६ अन्वये मंजुर)**

**40) संचालक मंडळ सदस्यासाठीची पात्रता निकष :-**

बँकेच्या ठेवींनुसार संचालक मंडळ निवडणूक लढविणेसाठी बँकेच्या क्रियाशील सभासदांनी खालील पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

| **अ. क्र.** | **बँकेच्या ठेवी** | **किमान भाग भांडवल (रुपये)** | **किमान ठेव रक्कम (रुपये )** |
|---|---|---|---|
| 1 | रु.100 कोटींपर्यंत | 5000 आणि | 25000 |
| 2 | रु.100 कोटींपेक्षा जास्त ते रु.500 कोटींपर्यंत | 10000 आणि | 50000 |
| 3 | रु.500 कोटी व त्यावरील | 15000 आणि | 100000 |

**<u>टीप :-</u>** निवडून आलेल्या संचालक मंडळाच्या पुर्ण कालावधीसाठी वरील ठेवी बँकेत राहतील.कायदा कलम 73 ब व क नुसार निवडणूक लढविणाऱ्या क्रियाशील सभासदांची सर्वसाधारण सभासदां साठी लागू असलेल्या पात्रता निकषांच्या 50% इतकी किमान भाग भांडवल व ठेव रक्कम असणे आवश्यक आहे.

**41) अध्यक्ष व उपाध्यक्षः-**

अ) संचालक मंडळ निवडणूकीनंतरच्या पहिल्या सभेमध्ये निवडून आलेल्या संचालकांमधून 5 वर्षांसाठी अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड करेल. 5 वर्षांचा कालावधी निवडणूकीच्या तारखेपासून मोजला जाईल. सदर सभेचे अध्यक्षस्थान कायदा व नियमांतील तरतूदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नेमलेला प्रतिनिधी भूषवेल.

ब) संचालक मंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्षपद अध्यक्षच भूषवतील.अध्यक्षांच्या गैरहजेरीत सभांचे अध्यक्षपद उपाध्यक्ष भूषवतील व दोघांच्याही गैरहजेरीत संचालक मंडळातील सदस्य आपल्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतील.

क) सभेच्या अध्यक्षांना स्वतःच्या मताव्यतिरिक्त निर्णायक मत राहील .सदर निर्णायक मताचा वापर समान मते पडल्यास करता येईल.

ड) स्विकृत तज्ञ संचालकांना अध्यक्ष/उपाध्यक्ष यांच्या निवडणूकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

**42) अध्यक्ष / उपाध्यक्षांचा यांचे अधिकार व कामे :-**

1) अध्यक्षांना खालील अधिकार व कार्ये पार पाडावी लागतील.

अ) साधारण सभा,संचालक मंडळ सभा व दोन उपसमिती सभा यांचे अध्यक्षपद भूषविणे.

ब) अध्यक्षपद भूषविलेल्या सर्व सभांच्या इतिवृत्तावर सह्या करणे.

क) एखाद्या ठरावावर सभेमध्ये समान मते पडल्यास अशा ठरावावर निर्णायक मत देणे. (कास्टिंग मत)

ड) संचालक मंडळ ,कार्यकारी समिती व इतर सभांचे आयोजन करणे.

इ) स्वतः असलेल्या अधिकारांमधील कांही अधिकार उपाध्यक्षांना प्रदान करणे.

फ) अध्यक्ष संचालक मंडळाचे ,कार्यकारी व इतर उपसमित्यांचेवतीने तातडीचे व महत्वाचे निर्णय घेऊ शकतील . असे निर्णय संबंधीत सभेपुढे पुढील सभेत पुर्नमान्यतेसाठी ठेवले जातील.

(2) उपाध्यक्षांना अध्यक्षांच्या गैरहजेरीमध्ये त्यांचे सर्व उपरोक्त कामकाज पार पाडावे लागेल.

**43) संचालक मंडळाचे इतिवृत्तः-**

संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे.सदर इतिवृत्तावर पुढील संचालक मंडळ सभेच्या अगोदर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या कराव्यात व पुढील सभेत इतिवृत्त कायम करण्यात यावेत. अशा प्रकारचे सह्या केलेले व मोहोर केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अधिकृत पुरावा म्हणून समजले जाईल.

**44) संचालक मंडळाचे अधिकार व कार्ये :-**

1) संचालक मंडळास बँकेचे कामकाज विविध कायद्याअंतर्गत सुरक्षित व व्यवस्थीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार आहेत.
2) कोणत्याही सर्वसाधारण अधिकारांना बाधा न आणता संचालक मंडळास असलेले अधिकार खालीलप्रमाणे :-

1) सभासदत्व मंजूर करणे आणि क्रियाशील, अक्रियाशील सभासदांच्या यादीस मंजूरी देणे.
2) बँकेसाठी संघटनात्मक उद्दिष्टे ठरविणे व सदर उदिष्टे पूर्ण करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.
3) रिझर्व्ह बँकेच्या व सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार विविध उपसमित्यांचे गठन करणे.
4) बँकेच्या व्यवहारांचे कालनिहाय आढवा /परीक्षण करणे.
5) मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे व त्यांना काढून टाकणे.
6) कर्मचाऱ्यांची नेमणूक,त्यांना द्यावयाचे पगार व भत्ते, सेवेच्या अटी व शर्ती,शिस्तभंगाची कारवाई इत्यादींच्या नियंत्रणासाठी योग्य ती तरतूद करणे.
7) साधारण सभेपुढे वार्षिक अहवाल,वार्षिक आर्थिक पत्रके,वार्षिक अंदाज पत्रक इ.मंजूरीसाठी ठेवणे.
8) लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील पूर्तता अहवालाचा विचार करणे व सदर अहवाल साधारण सभेपुढे ठेवणे.
9) इतर सहकारी संस्थाच्या सभासदत्वाचा आढावा घेणे.
10) वार्षिक व पुरवणी अंदाज पत्रकाचा आढावा घेणे.
11) निधींची उभारणी करणे.
12) सभासदांना कर्जे मंजूर करणे.
13) गुंतवणूक धोरण तयार करणे व बँकेचे निधी परवानगी असलेल्या रोख्यांमध्ये गुंतवणे.
14) शाखाविस्तार,विस्तारीत कक्ष,प्रशासकीय कार्या.व ए.टी.एम.केंद्रांसाठीचाप्रस्तावांवर विचार करणे.
15) रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळी येणाऱ्या आदेशानुसार ठेवी व कर्जावरील व्याजदर निश्चित करणे.
16) संचालक मंडळाच्या निवडणूकीचे आयोजन करणे.
17) सहकार खाते व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बँकिंग व्यवसाय करण्यासाठी विविध धोरणे व नियंत्रणे तयार करणे.
18) कायदा,नियम व पोटनियम यानुसार आवश्यक असलेल्या तसेच साधारण सभेने अधिकार प्रदान केलेल्या सर्व बाबींवर कार्यवाही करणे व सर्व कामकाज पार पाडणे.
19) कोणत्याही कर्जाची किंवा सवलतीची पुनर्रबांधणी / पुर्नरचना वेळोवेळी रिझर्व्ह बँकेने व सहकार निबंधक यांनी दिलेले मार्गदर्शनानुसार केली जाईल.
20) सभासद, संचालक व कर्मचारी यांच्या शिक्षण व प्रशिक्षणासाठी योग्य अशी व्यवस्था करणे.

**45) <u>संचालक पदासाठी अपात्र होणे. :-</u>**

कोणताही सभासद बँकेवर संचालक म्हणून निवडून येण्यास अथवा संचालक सदस्य होण्यास अपात्र ठरेल जर असा सभासद :-

1) कोणत्याही अधिकृत न्यायलयाने नादार म्हणून दोषी ठरविल्यास अथवा मानसिक दृष्टया दुर्बल आहे असे ठरविल्यास.
2) बँक व्यवसायाच्या अशा करारामध्ये संबंधित आहेत व भाग घेतला आहे ज्यामध्ये त्यास फायदा होत असले तर .
3) नैतिक अधपत्तनाच्या बाबींमध्ये दोषी ठरविण्यात आले असेल तर.

4) बँकेतील अशा कोणत्याही फायदा होणाऱ्या पदावर असेल तर.तथापि राज्य सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या धोरणानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा पूर्ण वेळ कर्मचारी किंवा सेवक प्रतिनिधी जरी पूर्ण वेळ पगार घेणारा सदस्य असला तरी अशा पदांकरीता पात्र ठरेल.
5) अन्य कोणत्याही सहकारी बँकेचा अथवा पतपेढीचा संचालक असल्यास.
6) त्यांचा व त्यांच्या कुटुंबियांचा बँकेने भाडेतत्वावर किंवा मालकी हक्काने घेतलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत हितसंबंध असल्यास.
7) कोणत्याही डिक्री अथवा रिकव्हरी सर्टिफिकेटनुसार त्यांचेकडून बँकेस कोणतीही रक्कम येणे असल्यास.
8) बँकेमार्फत अथवा बँकेविरुध्द काम करणाऱ्या कायदेशीर सल्लागाराकडे नोकरीत असल्यास अथवा त्याच्याशी संबंधीत असल्यास. (खुलासा :- कायदेशीर सल्लागार म्हणजे ॲडव्होकेटस् ॲक्ट 1961 च्या कलम 2 उपकलम 1 मधील क्लॉज 1नुसार असणारी कायदेशीर सल्लागाराची व्याख्या. )
9) कायद्यानुसार कोणत्याही गुन्ह्यामध्ये दोषी ठरविला गेला असल्यास.
10) कायद्यानुसार सभासद म्हणून अपात्र ठरल्यास.
11) कायद्यानुसार त्याचे सभासदत्व निष्कासीत झाले असल्यास.
12) सततच्या तीन संचालक मंडळ सभांना तो अनुपस्थित असल्यास व त्याची अनुपस्थिती संचालक मंडळाने सूट दिलेली नसल्यास .
13) सततच्या दोन वार्षिक सर्वसाधारण सभांना तो अनुपस्थित असल्यास आणि त्याची अनुपस्थिती संबंधित वार्षिक सभेतील सभासदांनी सुट दिलेली नसल्यास .
14) संचालक मंडळाचा कालावधी संपण्या अगोदर जर संचालकाने पोटनियम 40 नुसार किमान ठेवावयाची पात्रता ठेव काढून घेतल्यास.

**46) <u>संचालक मंडळ सभांसाठी गणपूर्ती :-</u>**

संचालक मंडळ सदस्य संख्येच्या 1/2किंवा त्यापेक्षा जास्त संचालक उपस्थित असतील तर गणसंख्या झाली असे समजण्यात येईल.
टीपः- जर संचालक मंडळाच्या संपुर्ण संख्येच्या निम्मे अपुर्णांकात असेल तर त्यापुढील संख्या (पुर्णांकातील संख्या) गणसंख्या समजण्यात येईल.
संचालक मंडळ सदस्य संख्येच्या 1/2किंवा त्यापेक्षा जास्त संचालक उपस्थित असतील तर गणपुर्ती झाली असे समजण्यात येईल. सदर संख्या अपूर्णांकात आली तर त्यापुढील पुर्ण संख्येस गणपुर्ती झाली असे समजण्यात येईल. संचालक मंडळ सभेच्या गणपुर्तीसाठी कार्यलक्षी संचालकांना मोजण्यात येणार नाही. पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकींव्यतिरिक्तच्या सभांमध्ये स्वीकृत तज्ञ संचालकांचा समावेश गणपूर्तीत केला जाईल.

**47) <u>संचालक मंडळावरील रिक्त जागा :-</u>**

संचालक मंडळावरील कोणतीही जागा रिक्त झाल्यास सदर जागा कायद्याच्या कलम 73 AAA(4)मधील तरतूदीनुसार भरली जाईल.

**48) संचालक मंडळ सभाः-**

1) संचालक मंडळापुढे चर्चेसाठी आलेल्या विषयावर बहूमताने निर्णय होतील. जेथे समान मते पडतील तेथे सदर सभेच्या अध्यक्षास एक निर्णायक मत (कास्टींग वोट) देण्याचा अधिकार राहील.
2) संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्या कारणासाठी ठेवलेल्या इतिवृत्त पुस्तकात नोंदणे आवश्यक आहे.
3) बँकेच्या अध्यक्षांच्या परवानगीने मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळ सभा बोलवतील.
4) महिन्यातून किमान एकदा संचालक मंडळाची सभा होणे आवश्यक आहे.
5) संचालक मंडळाची सभा शक्यतो बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात अथवा बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये ठेवण्यात यावी.
6) बँकेचे अध्यक्ष हे संचालक मंडळ सभेचे अध्यक्ष राहतील. त्यांच्या अनुपस्थितीत बँकेचे उपाध्यक्ष हे सभेचे अध्यक्ष राहतील. वरील दोघांच्या अनुपस्थितीत सदर संचालक मंडळ सभेस उपस्थित असणारे संचालक त्यांचेमधून एकाची त्या सभेकरीता अध्यक्ष म्हणून निवड करतील.
7) संचालक मंडळ सभेची नोटीस 7 दिवसांच्या पूर्व सूचनेने पाठविणे आवश्यक आहे.
8) अध्यक्ष हे सर्व संचालक व कार्यकारी समितीचे सभेचे अध्यक्ष राहतील.

**49) संचालक मंडळाच्या उपसमित्या :-**

संस्थेचे संचालक मंडळ एका कार्यकारी समितीचे आणि इतर समित्यांचे अथवा उपसमित्यांचे गरजेनुसार गठन करेल. कार्यकारी समिती सोडून इतर उपसमित्यांमध्ये जास्तीत जास्त 5 सदस्य असतील.

**४९(१)** मा.रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक क्र. RBI / 2019-20 / 128 / DOR (PCB) BPD . Cir. No. 8 / 12.05.002 / 2019-20 दि.31-12-2019 च्या सुचना / निर्देशा नुसार ( मा.अप्पर निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.ना.बँका/सआ-१/दिसंगमनेरमर्चन्टकोऑपबँक/पोनिदु/२१/८९२ दि.२६-४-२०२१ नुसार मंजुर)

मा.रिझर्व्ह बँकेचे मार्गदर्शक सुचने नुसार बोर्ड ऑफ मॅनेजमेंट (बीओएम) यांचे गठण करणे.

(1) **ओळख** :
मा.रिझर्व्ह बँकेने श्री.आर.गांधी डेप्युटी गव्हर्नर यांच्या अध्यक्षतेखाली नागरी सहकारी बँकाना व्यवसायाभिमुक मार्गदर्शन करणे साठी तसेच नागरी बँकांचे खाजगी बँकांत विलीनीकरण करुन बँकींग परवाना देणे संदर्भात दि.30.1.2015 रोजी समिती नियुक्त केली.
श्री.वाय.एम.मॅलेगन यांचे अध्यक्षते खाली नवीन नागरी सहकारी बँकांना परवानगी देण्यासाठी एक तज्ञ समिती स्थापन केली होती. या समितीने नागरी सहकारी बँकांच्या सध्यांच्या संचालका मधुन बोर्ड ऑफ मॅनेजमेंट (बीओएम) स्थापन करणेबाबत एक सुचना केली होती. मॅलेगन यांच्या सुचनांचा रिझर्व्ह बँकेने आता विचार करुन नागरी सहकारी बँकासाठी दि.25-6-2018 रोजी परिपत्रक काढले.

(2) **उद्देश** :
नागरी सहकारी बँका जनतेकडुन ठेवी गोळा करीत असल्यामुळे बँकींग क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असणा-या संचालकांचा बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मध्ये समावेश करुन व्यावसायीकता आणणे .

(3) **बोर्ड ऑफ मॅनेजमेंट ची रचना :**

सध्याच्या संचालक मंडळा व्यतिरीक्त प्रत्येक नागरी बँके मध्ये बोर्ड ऑफ मॅनेजमेंट असावे. ज्या बँकेच्या ठेवी रु.100 कोटी पेक्षा जास्त आहेत त्यांनी बोर्ड ऑफ मॅनेजमेंट (बीओएम) ची स्थापना एक वर्षाच्या आंत करावी व ज्या बँकेच्या ठेवी रु.100 कोटी पेक्षा कमी आहेत त्यांनी बोर्ड ऑफ मॅनेजमेंट ची स्थापना दोन वर्षाच्या आंत करावी.

(4) **बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील प्रतिनिधी संख्या** :

रु.100 कोटी पर्यंत ठेवी असणा-या नागरी सहकारी बँका मध्ये कमीत कमी 3 प्रतिनिधी असतील तर रु.100 कोटी पेक्षा जास्त ठेवी असणा-या बँका मध्ये कमीत कमी 5 प्रतिनिधी राहतील  मात्र याची संख्या 12 पेक्षा जास्त नसावी.

(5) **बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील संचालकांची शैक्षणीक पात्रता** :

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील सर्व संचालकांना पुढील विषयातील एक किंवा जास्त विषयांतील ज्ञान किंवा व्यावहारिक ज्ञान असावे.

1-अकौन्टन्सी, 2-ॲग्रीकल्चर ॲण्ड रुरल इकॉनॉमी

3-बँकींग, 4-को-ऑपरेशन, 5-अर्थशास्त्र,

6-फायनान्स, 7-लॉ, 8-लघु उद्योगधंदे, 9-माहिती तंत्रज्ञान, 10-एखाद्या व्यक्तीचे ज्ञान हे नागरी सहकारी बँकासाठी उपयोगी पडेल अशी व्यक्ती.

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील सदस्यांचा त्या बँकेच्या आर्थिक व्यवहाराशी आधी 3 वर्षाचा किंवा सध्या संबंध नसावा. परंतु तो बँकेचा ठेवीदार असु शकतो.

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील व्यक्तीची निवड ही सध्यांच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर मधुन करता येईल. परंतु त्यांनी वरील विषयामधील पुर्तता केली असावी. परंतु त्यांची संख्या बोर्ड ऑफ डायरेक्टरच्या 50% पेक्षा जास्त नसावी. तसेच कुठल्याही परिस्थीतीत बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे कमीत कमी 2 प्रतिनिधी हे सध्यांच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर शिवाय असणे आवश्यक राहील.

(6) **बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या सभा :**

बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या सभा गरज भासेल तेव्हा घेण्यात याव्यात. या समितीचे अध्यक्ष हे बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील इतर सदस्य ठरवतील किंवा सध्याचे बोर्ड ऑफ डायरेक्टर त्यांची निवड करेल.

(7) **मिटींग भत्ता** :

बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या सदस्यांना बँकेच्या पोटनियमा प्रमाणे बैठक भत्ता मिळेल.

(8) **बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चा कालावधी :**

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चा कालावधी हा बोर्ड ऑफ डायरेक्टर यांच्या कालावधी एवढाच राहील.

(9) **बोर्ड ऑफ डायरेक्टरची कार्ये :**

बोर्ड ऑफ डायरेक्टर बँकेच्या सर्वसाधारण कामकाजा वर लक्ष ठेवतील तसेच सहकारी कायद्यास आधिन राहुन बँकेच्या व्यवस्थापनामध्ये नियंत्रण ठेवतील. बोर्ड ऑफ डायरेक्टर हे बँके मध्ये वरिष्ठ धोरण ठरवतील. वेगवेगळ्या समित्यांचे व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे गठण करतील व त्यांच्या मदतीने बँकेची जबाबदारी पार पडतील.

बोर्ड ऑफ डायरेक्टर बँकेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक करतील. सदर अधिकारी हा फीट ॲण्ड प्रॉपर या मधील बाबींची पुर्तता केलेला असावा व ज्या नागरी सहकारी बँकांच्या ठेवी रु.100 कोटीपेक्षा जास्त आहेत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक करतांना रिझर्व्ह बँकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

(10) **बोर्ड ऑफ मॅनेजमेंट ची कार्ये :**

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट हे बोर्ड ऑफ डायरेक्टरला जबाबदारी राहतील.

1-बँकेच्या कर्जधोरणाप्रमाणे आलेली कर्जप्रकरणे बोर्ड ऑफ डायरेक्टरला किंवा कर्ज समितीला शिफारस करणे.

2-अनुत्पादित कर्जाची वसुली किंवा एक रकमी कर्ज फेड योजनातील कर्ज प्रकरणांची शिफारस करणे.

3-निधी नियोजन व गुंतवणुकी संदर्भात इन्व्हेस्टमेंट कमिटी किंवा बोर्ड ऑफ डायरेक्टरला शिफारस करणे.

4-बँकेचे अंतर्गत नियंत्रण, बँकेसाठी रिस्क मॅनेजमेंट पॉलीसी तयार करणे, व त्यांची अंमलबजावणी करणे.

5-बँकेमध्ये संगणकीकरण व तत्रज्ञानाची अंमलबजावणी करणे.

6-अंतर्गत तपासणी व इन्स्पेक्शन त्यांची पुर्तता करण्याचे काम.

7-ग्राहकसेवा, त्यांच्या अडचणी सोडविणे.

8-याशिवाय बोर्ड ऑफ डायरेक्टर यांनी वेळोवेळी दिलेल्या जबाबदा-या

एखाद्या वेळी बोर्ड ऑफ मॅनेजमेंटने केलेल्या शिफारसीबाबत बोर्ड ऑफ डायरेक्टर चे दुमत असेल तर त्यांची लेखी नोंद कारणासहित घेण्यात यावी.

(11) **मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्ये :**

बोर्ड ऑफ डायरेक्टरे दिलेल्या अधिकारा मध्ये बँकेचा मुख्य कार्यकारी अधिकारी काम करेल तो बोर्ड ऑफ डायरेक्टर व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चा एक्स ऑफीसीओ सभासद असेल.

(12) **मा.रिझर्व्ह बँकेचे अधिकार :**

जर बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील सदस्य किंवा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे रिझर्व्ह बँकेने ठरवुन दिलेली पात्रता गहन केलेले नसतील किंवा ते बँकेच्या व ठेवीदाराचे हिताचे कामे करीत नसतील. तर त्यांना काढुन टाकण्याचे अधिकार मा.रिझर्व्ह बँकेस राहील. व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट मधील सदस्य किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नवीन नियुक्ती 3 महिन्यांत बोर्ड ऑफ डायरेक्टरने करावयाच्या आहेत. या काळात बोर्ड ऑफ डायरेक्टर हे बोर्ड ऑफ मॅनेजमेंट कार्य करेल.

(13) **पोटनियम दुरुस्ती करणे** :

बोर्ड ऑफ डायरेक्टर मार्फत बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे गठण केलेनंतर सदरच्या पोटनियम दुरुस्तीस वार्षिक सभेची मंजुरी घेऊन पोटनियम दुरुस्ती प्रस्ताव मा.सहकार खात्याची परवानगी घेऊन त्याची अंमलबजावणी करावी.

(14) **बीओएम गठण हे कार्यक्षेत्र वाढीसाठी बंधनकारक** : बँकेमध्ये बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे गठण हे अनिवार्य असुन बँकेचे कार्यक्षेत्र वाढीसाठी व नवीन शाखा मजुरीशी ते संबंधीत राहील.

50) <u>मुख्य कार्यकारी अधिकारी ,त्यांचे अधिकार व त्यांची कर्तव्येः-</u>

रिझर्व्ह बँक व सहकार खाते यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या फीट ॲन्ड प्रॉपर क्रायटेरीयानुसार संचालक मंडळ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नेमणूक करेल. तो बँकेचा पूर्ण वेळ सेवक असून संचालक मंडळास त्यांच्या कामकाजात वेळोवेळी मदत करेल. संचालक मंडळाच्या मार्गदर्शनानुसार तो आपले पुढील अधिकार कर्तव्य पार पाडेल.

1) बँकेच्या दैनंदिन व्यवस्थापनावर लक्ष ठेवणे.
2) बँकेच्या वतीने बँकेची खाती चालविणे.तसेच रोखतेसाठी सेफ डिपॉझीट लॉकर्सची सुविधा उपलब्ध करणे.
3) बँकेच्या वतीने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर सह्या करणे.
4) बँकेच्या वतीने आवश्यक ती सर्व हिशेबाची पुस्तके ठेवणे,आवश्यक ते सर्व रेकॉर्ड तयार ठेवणे,कायदा,नियम आणि उपविधींनुसार आवश्यक त्या ठिकाणी विहीत नमुन्यातील विवरण पत्रके दाखल करणे या संबंधीची सर्व योजना करणे.
5) अध्यक्षांच्या सुचनेनुसार सर्वसाधारण सभा,संचालक मंडळ सभा बोलावणे,कार्यकारी समिती आणि उपसमित्यांच्या सभा बोलावणे आणि सदर सभांचे इतिवृत्त तयार करणे.
6) संचालक मंडळाच्या संमतीने बँकेतील विविध जागांकरिता नेमणूका करणे.
7) बँकेची उद्दिष्ट,विविध धोरणे तसेच भविष्यकाळासंबंधि नियोजन करण्याकरीता संचालक मंडळास मदत करणे.
8) संचालक मंडळास वेळोवेळी आवश्यक ती माहिती देणे तसेच बँकेच्या कामकाजाविषयी रिझर्व्ह बँकेने दिलेल्या कॅलेंडर ऑफ रिव्हयू प्रमाणे वेळोवेळी माहिती देणे व रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक निरिक्षणासंबंधी माहिती देणे.
9) संचालक मंडळाच्या सभेमध्ये ठेवण्यात येणाऱ्या प्रत्येक विषयाबाबत स्वतःचे स्पष्ट मत सूचना आणि सल्ला लेखी स्वरुपात देणे.
10) बँकेच्या वतीने न्यायालयीन प्रक्रियेसाठी वकीलांची नेमणूक करणे.
11) आर्थिक वर्ष संपल्यानंतर 30 दिवसांमध्ये वार्षिक अहवाल,हिशेबाची परिपत्रके संचालक मंडळाच्या संमतीसाठी तयार करणे.
12) संचालक मंडळाने प्रदान केलेले व पोटनियमानुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार बँकेच्या कामकाजातील कर्तव्ये पार पाडणे.
13) मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतःला आवश्यक वाटतील असे काही अधिकार बँकेतील इतर अधिकाऱ्यांना बँकेच्या संचालक मंडळाच्या पूर्व परवानगीने प्रदान करु शकतील.
14) मुख्य कार्यकारी अधिकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित असणाऱ्या सभासदांच्या उपस्थितीचे सर्व रेकॉर्ड तयार करुन स्वतःच्या कस्टडीमध्ये ठेवतील.
15) सर्वसाधारण सभा झाल्यानंतर एक महिन्यांचे आत उपस्थित सभासदांची यादी निबंधकांकडे पाठविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर राहील.तसेच सदर यादी सर्व शाखा व रजिस्टर्ड ऑफिसच्या नोटीस बोर्डावर प्रदर्शित करतील.

51) <u>ठेवीः-</u>

1) बँकेस सहकार कायदा व नियम तसेच रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार आणि संचालक मंडळाच्या मंजूरीने त्या त्या वेळेच्या निर्णयानुसार वेगवेगळ्या व्याजदराने ठेवी स्वीकारता येतील.

2) अशा ठेवी या चालू खाती,बचत खाती,रिकरिंग खाती,पुनगुंतवणूक खाती अथवा एखाद्या विशिष्ट योजनेनुसार येणारी खाती इत्यादी प्रकारात स्वीकारता येतील.परंतू अशी खाती स्वीकारतांना के.वाय.सी.नियमावलीचे पालन करणे आवश्यक आहे.
3) बँकेच्या सर्व ठेवी विमा महामंडळ कायदा 1961 नुसार सुरक्षित असतील आणि विमा महामंडळ कायद्यातील तरतूदींनुसार त्या नियंत्रित केल्या जातील.
4) अशी खाती उघडण्यासाठी व ती नियंत्रीत करणेसाठी बँकेस या संदर्भात रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या सूचना ,मार्गदर्शक तत्वे आणि आदेश यांचे पालन करणे आवश्यक आहे.

**52) <u>कर्ज व्यवहार :-</u>**

अ) सभासदांना खाली निर्देशित केल्याप्रमाणे विनातारण किंवा तारणापोटी अथवा संचालक मंडळाने मान्य केलेल्या इतर तारणांपोटी कर्ज,कॅश क्रेडिटस् व ओव्हरड्राप्टस् मंजूर करता येतील. मात्र याबाबत रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी येणाऱ्या कर्ज व्यवहाराबाबतच्या आदेशाचे पालन करावे लागेल.

1) व्यक्तिगत तारण किंवा इतर सभासदांची जामिनकी / नाममात्र सभासदांची जामिनकी.
2) स्थावर अथवा जंगम मालमत्तेचे सहतारण .(कोलॅटरल)
3) औद्योगिक माल,व्यापारी माल,शेती माल किंवा इतर बाजार मूल्य असलेल्या वस्तू , मशिनरी यांच्यावर ताबे गहाण,नजरगहाण व इतर प्रकारे बोजा निर्माण करुन.
4) सरकारी कर्जरोखे,विश्वस्त संस्थांचे कर्जरोखे ,मान्यताप्राप्त कंपनीचे भाग,डिबेंचर्स व मुदत ठेवी यांचे तारणावर.
5) विमा पॉलिसीचे तारणावर.(सरेंडर व्हॅल्यूपोटी)व पोस्ट सर्टिफिकेट तारणावर.
6) वखारपावतीचे तारणावर.
7) सोने व चांदीच्या दागिण्यांच्या / लगडी तारणापोटी.
8) कोणत्याही इतर दृश्य तारणापोटी.उदा.वाहने.
9) रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी आलेल्या परिपत्रांमध्ये नमूद केलेल्या अन्य तारणावर.

ब) मुदत ठेवीच्या तारणापोटी बिगर सभासदास कर्ज / उचल मंजूर करणे.

क) रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार नाममात्र सभासदांना कर्ज मंजूर करणे.

ड) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व निबंधक यांनी वेळोवेळी ठरविलेल्या नियमानुसार संचालक मंड़ळाने कर्ज मंजूरीबाबत,योग्य तो दुरावा,विनातारण कर्जाचे प्रमाण, कर्जाच्या अटी व नियम (कारणानुसार व तारणानुसार ) योग्य ते धोरण व नियम ठरविणे आवश्यक आहे.

इ) संचालक मंडळ सभा / कर्ज उपसमिती सभा यांना कर्ज अर्जातील अटी व शर्तीनुसार ते मंजूर करण्याचे अधिकार असतील अथवा कुठलेही कारण न देता सदर कर्जअर्ज नामंजूर करण्याचे अधिकार असतील. संचालक मंडळ सदस्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्ज अर्जांवर दिलेल्या शेऱ्यानुसारच कर्ज मंजूरीबाबत किंवा नामंजूरीबाबत योग्य तो निर्णय घेता येईल.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस नसलेल्या कर्जांना मंजूरी देतांना संचालक मंडळ त्याबाबत कारणे नोंदवेल.

फ) सर्व प्रकारची कर्जे देतांना रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे पालन होईल हे पाहणे आवश्यक आहे.

**53) बँकिंग व्यतिरिक्त होणाऱ्या जास्तीत जास्त खर्चाची मर्यादा :-**

अ) संचालक व त्यांच्या नातेवाईकांच्या संबंधित संस्था व फर्मला बँकेस कोणत्याही प्रकारची देणगी किंवा जाहिरात देता येणार नाही.
ब) बँक त्रयस्थ संस्थांना प्रायोजक म्हणून जाहीरात देऊ शकणार नाही.
क) कोणत्याही सामाजिक कार्यासाठी खर्च करत असतांना बँक सामाजिक बांधिलकीचा निधी उभारुन त्याबाबतचे स्वतंत्र नियम तयार करुन खर्च करु शकेल.
ड) मागील वर्षाच्या जाहीर निव्वळ नफ्याच्या 1% पर्यंतचाच खर्च हा देणग्या किंवा सामाजिक कार्यासाठी करता येतील.

**54) नफ्याची वाटणी :-**

सहकारी संस्था कायदा व नियम यास अनुसरुन बँकेचा निव्वळ नफा काढला जाईल व त्याची वाटणी केली जाईल.

1) संचालक मंडळाचे शिफारशीनुसार निव्वळ नफ्याची वाटणी सर्वसाधारण सभेत खालीलप्रमाणे करण्यात येईल.
   अ) सहकारी संस्था कायद्याचे तरतूदीनुसार 25% पेक्षा कमी नाही इतका नफा वैधानिक राखीव निधीत जमा केला जाईल.
   ब) वर कलम अ मधील तरतूदीव्यतिरिक्त कमीत कमी 10%ज्यादा निधी वैधानिक राखिव निधीत ,नफा शिल्लक असेल तर भविष्यातील अनपेक्षित तोटयांसाठी वर्ग करावा.
2) उर्वरित निव्वळ नफ्याची विभागणी खालीलपैकी एका कारणासाठी किंवा सर्व कारणासाठी त्यासाठी केलेल्या नियमावलीनुसार करता येईल.
   अ) वार्षिक साधारण सभेने ठरविल्यानुसार व कायदा व नियमानुसार सभासदांना लाभांश देणेसाठी नफ्यातील रक्कम वर्ग करणे.
   ब) मागील निवडणूकीच्या खर्चाच्या 1/5 रक्कम निवडणूक निधी म्हणून वर्ग करता येईल.
   क)संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार शैक्षणिक निधी म्हणून कमीत कमी 5% किंवा जास्तीत जास्त 10% पर्यंत रक्कम संचालक व सेवक यांच्या प्रशिक्षणासाठी शैक्षणिक निधीत वर्ग करता येईल.
   ड) रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार गुंतवणूक चढ - उतार निधी करीता आवश्यक ती रक्कम वर्ग करावी.
   इ) संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार निव्वळ नफ्याच्या 10% पर्यंत रक्कम तंत्रज्ञान विकास निधी म्हणून वर्ग करता येईल.
   फ) शिल्लक रहिलेला निव्वळ नफा इमारत निधीस वर्ग करता येईल.

**55) भाग भांडवलाची कर्जाशी प्रमाण :-**

कर्जदार सभासदासाठी भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढीलप्रमाणात राहील.
1) विनातारणी कर्जासाठी कर्जरकमेच्या 5% पर्यंत.
2) तारणी कर्जासाठी कर्जरकमेच्या 2.5% पर्यंत.

(3) लघु उद्योग धंद्यासाठी एकुण 2.5% पैकी सुरुवातीस कर्जरकमेच्या 1% पर्यंत व उर्वरीत 1.5% पुढील दोन वर्षात घेता येईल.

तथापि कोणत्याही सभासदाला बँकेच्या भाग भांडवलाच्या 1/5 इतकी रक्कम जास्तीत जास्त घेता येईल.
तथापि रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारावर बंधनकारक राहतील.
तथापि भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण 12% पेक्षा जास्त झाल्यास रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार तारणी कर्जाच्या बाबतीत हे प्रमाण बँक बदलू शकेल.

**56) <u>निधीची गुंतवणूक :-</u>**

बँक निधीची गुंतवणूक खालीलप्रमाणे करु शकेल.

1) राज्य सहकारी बँक,केंद्रिय सहकारी बँक की जीचा मागील सतत तीन वर्ष लेखापरिक्षण वर्ग अ असेल किंवा
2) इंडियन ट्रस्ट ॲक्टच्या सेक्शन 20 मध्ये नमूद केलेल्या कर्ज रोख्यांमध्ये किंवा
3) दुय्यम संस्था किंवा इतर संस्था यांच्या भागांमध्ये किंवा त्यांचे मालमत्तेमध्ये किंवा
4) रिझर्व्ह बँकेने निर्देशित / मान्यता दिलेल्या कोणत्याही इतर प्रकारामध्ये.

**<u>स्पष्टीकरण :-</u>** बँक म्हणजे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट 1949 नुसार निश्चित केलेल्या बँकिंग कंपनी ज्यामध्ये

- स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा 1955 नुसार स्थापित झालेली स्टेट बँक ऑफ इंडिया व त्या कायद्यात होणारे वेळोवेळी बदल.
- स्टेट बँक ऑफ इंडिया (संलग्न बँक ) कायदा 1959 नुसार कोणतीही सलग्न बँक व या कायद्यात होणारे वेळोवेळी बदल.
- राष्ट्रीयकृत बँक किंवा व्यापारी बँक.
- बँकिंग कंपनी (ॲक्वीझिशन ॲन्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंग कायदा 1970) किंवा बँकिंग कंपनी (ॲक्वीझिशन ॲन्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंग कायदा 1980) त्यानुसार कोणतीही स्थापित केलेली नविन बँक व सदर कायद्यात होणारे वेळोवेळी बदल.
- कोणतीही शेड्युल्ड / आंतरराज्य शेड्युल्ड सहकारी बँक जी मागील तीन वर्षापासून सतत नफ्यामध्ये आहे व जिचा लेखापरीक्षण वर्ग अ किंवा ब आहे.

**57) <u>राखीव निधी :-</u>**

1) सहकारी कायदा नियम व पोटनियम यात नमूद केलेल्या रकमेशिवाय राखीव निधीत प्रवेश फी,नाममात्र सभासद फी,भाग वर्ग करण्याची फी, जप्त केलेल्या भागांची रक्कम,जप्त केलेल्या लाभांशाची र्क्कम व देणग्या या रकमा जमा करता येतील.
2) राखीव निधीची गुंतवणूक कायदा व नियमानुसार करता येईल.
3) राखीव निधीची रक्कम निबंधकाच्या पुर्व परवानगीने व महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा 1960 व त्याचे नियम यानुसार कोणत्याही प्रकारची मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरु शकेल.

**58) <u>लाभांश :-</u>**

1) जाहीर केल्यानुसार लाभांशाची रक्कम ती ज्या सहकारी वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी सदरहू भाग ज्याचे नावाने बँकेचे पुस्तकात असेल त्यास देण्यात येईल.

2) भागधारकांची रक्कम जितके महिने असेल त्या प्रमाणात तसेच भागाचे प्रमाणात कटमितीने लाभांश दिला जाईल.
3) लाभांशाची रक्कम बँकेच्या मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये मिळू शकेल.
4) लाभांश जाहीर केल्यानंतर तीन वर्ष न घेतलेल्या लाभांशाची रक्कम जप्त करुन राखीव निधीत जमा केली जाईल.
5) मागील वर्षी भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जाहीर केलेल्या किमान प्रमाण इतके असेल तर जास्तीत जास्त 15% पर्यंत लाभांश देता येईल.

**59) <u>हिशेब ,नोंदी व लेखापरीक्षण :-</u>**

1) बँकेतील व्यवहाराबद्दलचे दप्तर व हिशेब मे.निबंधक,सहकारी संस्था व रिझर्व्ह बँक यांनी ठरवून दिलेल्या व मान्य केलेल्या नमुन्यात ठेवले जातील. बँकेचा कोणताही सभासद त्याचे संबंधित व्यवहारविषयी हिशेब व रजिस्टर्स बँकेच्या कामकाजाचे वेळात पुर्वसूचनेनुसार वेळ ठरवून पाहू शकेल.
2) बँकेच्या हिशेबांचे लेखापरीक्षण मा.निबंधक यांनी मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांच्या यादीतील किंवा स्वतः बँकेने मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांच्या यादीतील लेखापरीक्षकांकडून प्रत्येक आर्थिक वर्षात किमान एकदा करण्यात येईल. सदर लेखापरीक्षणाचे मानधन ठरविण्याचा अधिकार मा.निबंधक यांना किंवा बँकेस राहील.
3) सदरचे लेखापरीक्षकांची नेमणूक व त्याकरीताचे मानधन यास वार्षिक साधारण सभेत मान्यता घ्यावी लागेल. तसेच त्याची पात्रता,अपात्रता,अधिकार ,कर्तव्ये व जबाबदऱ्या ह्या रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार आणि कायद्यानुसार असतील.

**60) <u>बँकेची मोहर (सील ):-</u>**

बँकेचे एक मोहर (सील )तयार करण्यात येईल व ते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे ताब्यात राहील. सदरहू मोहर (सील) एक संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष संचालक मंडळाचे ठरावाप्रमाणे वापरले जाईल.

**61) <u>पोटनियमाची दुरुस्ती :-</u>**

1) पोटनियमाची कोणत्याही कलमामध्ये बदल करण्यासाठी किमान 14 दिवसाची पूर्वसूचना सभासदांना देणे आवश्यक आहे.
2) पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल,दुरुस्ती,वाढ अगर रद्द करण्यासाठी सभेमध्ये एकूण हजर व मतदान करणाऱ्या 2/3 सभासदांचे बहूमत आवश्यक राहील.त्याशिवाय कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही.
3) उपरोक्त मंजूर झालेल्या पोटनियमांची अंमलबजावणी निबंधकाची लेखी मंजूरी आलेल्या तारखेपासून होईल.

62) **<u>सभासदांसाठी शैक्षणिक वर्ग :-</u>**

बँक वेळोवेळी सभासदांसाठी तसेच त्यांच्या संचालकांसाठी ,कर्मचाऱ्यांसाठी सहकारी प्रशिक्षण वर्ग आयोजित करेल व त्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन देईल.

63) **<u>भविष्य निर्वाह निधीः-</u>**

भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 नुसार बँक भविष्य निर्वाह निधीसाठी कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात होणाऱ्या भविष्य निर्वाह निधी इतकीच रक्कम वर्गणी निधी म्हणून जमा करेल अथवा बँकेचा हिस्सा म्हणून भविष्य निर्वाह निधी खात्याकडे पाठवेल.

64) **<u>सेवाशर्तीः-</u>**

संचालक मंडळ सेवकांच्या सेवाशर्ती व नियंत्रणासाठी सर्व्हिस रुल्स तयार करेल व त्यामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार दुरुस्तया करेल.

65) **<u>समारोप करणे :-</u>**

जर बँकेचा कारभार गूंडाळणे आवश्यक असेल तर,सदरची प्रक्रिया ही कायदा व नियम यातील तरतूदीनुसार राहील.

66) **<u>व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेमधील कर्मचारी असोसिएशनचा सहभाग :-</u>**

प्रशासकीय सूचनेव्दारे कर्मचारी असोसिएशनच्या व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग असण्याच्या दृष्टिने योग्य ते नियम बँक करु शकते.

67) **<u>इतर :-</u>**

1) बँकेस महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे बँकेस सभासद होता येईल. याशिवाय खालील संस्थांची बँक वर्गणीदार सभासद होऊ शकेल.
   अ) नागरी सहकारी बँकांचे राज्य स्तरावरील फेडरेशन.
   ब) नागरी सहकारी बँकांचे राज्य स्तरावरील असोसिएशन.
   क) प्रादेशिक / जिल्हा स्तरावरील नागरी सहकारी बँकांचे असोसिएशन.
   ड) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ / जिल्हा सहकारी बोर्ड.
   इ) इंडियन इन्स्टीट्युट ऑफ बँकर्स.
   फ) भारतीय बँकर्स असोसिएशन.
   फ) भारतीय सहकारी असोसिएशन.
   ग) राष्ट्रीय सहकारी युनियन.
   ह) नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप.बँक्स ॲन्ड क्रेडिट सोसायटीज.
   ई) बँकिंग सेक्टरशी संबंधित असणारे इतर कोणतेही फेडरेशन /असोसिएशन /संघ/बोर्ड.

2) बँकेच्या निवडणूक प्रक्रीयमध्ये राहिलेला दोष अथवा संचालक मंडळातील रिकामी जागा न भरणे वगैरे कारणांसाठी वार्षिक सर्वसाधारण सभा अथवा संचालक मंडळ सभांमधील कोणातही निर्णय बेकायदेशीर ठरणार नाहीत.

अ) बँकेच्या पोटनियमातील एखाद्या पोटनियमाच्या अर्थाबाबत शंका निर्माण झाल्यास सदरची शंका निरसनासाठी मा.निबंधक यांचा सल्ला घेण्यात यावा व त्यांनी याबाबत दिलेला निर्णय हा अंतीम राहील.

ब) डिक्री. ऑर्डर्स,निर्णय याबाबत कार्यवाही करतांना कायद्यातील सर्व तरतूदींचे पालन करावे.

क) वरिष्ठ पातळीवरील अपील व संबंधित केसची पुनरावलोकन याचिका या कायदेशीर तरतूदींनुसार असाव्यात.

ड) गुन्हा व दंड याबाबतची कार्यवाही कायद्यातील तरतूदीनुसार करावी.

इ) निबंधकांकडे माहिती सादर करतांना कायद्यातील तरतूदींचे पालन करावे.

फ) वरीलबाबत पोटनियमांमध्ये एखादी तरतूद नसल्यास अशावेळी कायदा व नियमातील तरतूदींनुसार निर्णय प्रक्रिया पार पाडावी.

------------------------------------xxxxxxxxxxxxxxx------------------------------------------

(**टीप :-** महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागामार्फत राज्यातील नागरी सहकारी बँकांसाठी तयार करण्यात आलेल्या आदर्श उपविधीच्या मसुद्याचा हा स्वैर मराठी अनुवाद आहे.जेथे जेथे अर्थ स्पष्ट होत नाही तेथे शासकीय नियमानुसार नेमका अर्थ लावण्यासाठी इंग्रजीतील मसुदा ग्राह्य धरावा.)

या कार्यालयाचे ज्ञापन जा.क्र.ना.बँका / डी-4 /दिसंगमनेरमर्च.बँक / पोनिदु / २०१४, दि.३ /०४/२०१४ अन्वये बँकेचा पोटनियम क्र. १ ते ६७ मंजूर . सदर पोटनियम मंजूर झाल्यामुळे यापूर्वीचे पोटनियम रद्द करणेत येत आहेत.

सही/-
अपर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

दि संगमनेर मर्चन्ट्स को.ऑप.बँक लि,संगमनेर करिता

दिनांक 31-3-2023

मुख्य कार्यकारी अधिकारी चेअरमन